# अग्निदिव्य:

मोहना कारखानीस



माझ्यामना ई प्रकाशन

# अग्निदिव्य:

( लघु कथा )

मोह्‌ना कारखानीस

प्रकाशन

माझ्यामना ई प्रकाशन

संपादक

अनघा हिरे

उपसंपादक

शितल पोटे

ज्योती कपिले

मनोगत



आज मी ई बुक च्या सर्वस्वी नवीन जगात माझे पहिले पाऊल टाकीत आहे.त्याबद्दल लेखिका प्रकाशिका आणि माझ्यामना ई प्रकाशनाचा तंबू आपल्या समर्थ खांद्यावर पेलणार्या माझ्या स्नेही आणि सखी अनघा हिरे ह्यांचे मी सर्व प्रथम मनापासून आभार मानते. तसेच त्यांच्या हौशी आणि मेहनती सहकार्यांचेही तेव्हढेच मनापासून आभार.

माझा लेखन प्रवास हा काही फार जुना नाही.अगदी अलीकडेच मी चा. का. प.मासिकासाठी एक कथा लिहिली आणि त्याला प्रथम बक्षीस मिळाल्यावर मनाला एक हुरूप आला .सुरवातीला अनोखी वाटणारी ही लेखनाची वाट मला आपसूकच कधी जीवाभावाची वाटू लागली कळलेच नाही.शिवाय संख्याशास्त्र आणि मार्केटिंग मध्ये शिक्षण झालेले आणि कामाचा अनुभवही संशोधनातालाच. पण गिर्हैकांचे संशोधन (consumer research ) करताना व्यक्तींच्या स्वभावाचे निरीक्षण करण्याचा छंद मनाला नकळतच लागला. आणि मग त्यातूनच सकारात गेली विविध व्यक्ती चित्रणे.माझ्या लेखणीतून, माझ्या कथेतून साकारलेली ही व्यक्ती चित्रे कधी ना कधी प्रत्यक्ष आयुष्यात कुठल्या तरी वळणावर भेटत गेली होती. तरीही अमुक एक पात्र

म्हणजे अमुक एक व्यक्ती असें काही बोट ठेवून म्हणता येणार नाही. प्रत्येक व्यक्ती ही आयुष्यात घडणाऱ्या प्रश्नांना विविध प्रकारे सामोरी जाते. विशेषता स्त्रियांचे भावविश्व अगदी तरल, हळुवार आणि विविध पापुद्रे ल्यालेले असते. ते पापुद्रे तेव्हढ्याच हळुवार पणे उलगडून दाखवणे एव्हढी ताकत माझ्या लेखणीत नसावी पण तरीही मी माझ्या पद्धतीने साध्यासरळ शब्दात ती मांडणी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.माझ्या बहुतेक कथा अगदी सामान्य स्त्रियांना नायिका म्हणून मिरवितात. कारण त्यांची सुख-दुखे , भावुकता, कुटुंबावरील प्रेम आणि एकूणच

कोणत्याही खडतर परिस्थितीत चिवटपणे झुंज देण्याची त्यांची वृत्ती ह्या गोष्टी माझ्या मनाला नेहमीच भुरळ पाडतात.

माझे बोट धरून मला वेळोवेळी पुढील  मार्ग दाखविणारी माझ्या आयुष्यात आलेली काही मंडळी अगदी देवा सारखी भेटल्यामुळे माझा लेखनाच्या मार्गावर सुरुवातीला अडखळणारी पावले अगदी दुडूदुडू धावू लागली तेव्हा त्यांचे स्मरण केल्याशिवाय मला पुढे जाताच येणार नाही.ह्या मंडळीत सासर माहेर च्या प्रकाशिका,  गृहलक्ष्मी, प्रपंच,  अक्षरधन ह्या मासिकांचे आभार मानायलाच हवे. तसेच श्री समर्थ वाचनालय ने दिलेले प्रोत्साहन मी कधीच विसरू शकणार नाही.व्यक्तिगत आयुष्यात माझा नवरा -संजय . माझी मुलगी सोनल, सासूबाई आणि आई वडील ह्यांनी दिलेल्या शाब्दिक आधारामुळे ही वाट आणखीनच मखमली होत गेली आहे असें वाटते.

दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेल्या आणि पारितोषिके मिळालेल्या  काही  कथा ह्या पुस्तकात समाविष्ट करत आहे.

मोहना कारखानीस

कथा -

१. पिल्लू
२. अग्निदिव्य
३. पैंजण
४. पन्नाशी ओलांडताना
५. तो मी नव्हेच
६. पिझ्झा  हट
७. माय
८. दिवाळी

©माझ्यामना ई प्रकाशन

# १ पिल्लू

शेवरी

शेवरीने हातपाय लांब करुन छान आळस दिला. पंजे पालथे करुन एकदा तोंड पुसले. मग सर्व काही मनासारखे झाल्यामुळे खुषीत येऊन मियॉव केले. त्यामुळे तिचा मूळचा (गोरापान) पांढराषुभ्र चेहरा आणखीनच गोड दिसू लागला. तुकतुकीत केसांची पाठ अजूनच चमकदार दिसू लागली. सकाळची कोवळी किरणे एव्हाना तिच्या डोळयावर पडून परावर्तीत होत होती. त्यामुळे जणू काही दोन पाचूच लखलखीत असे वाटत होते. गोंडेदार शेपटी तिच्या एकूण रुबाबात भर घालीत होती. हातपाय ताणून ती उभी राहीली आणि तिने आजूबाजूला पाहिले. बंगल्यातील माणसे अजूनही झोपलेली होती वाटते. आजोबा, आजी, अमेय दादा, वहिनी, अनुराग, कामवाली शेवंता, षिवाय बागेचा माळी, स्वयंपाकीण काकू एकेक करुन येतील आता. बंगल्याला सर्वात प्रथम जाग येते ती आजोबांच्या खोकल्याने. सकाळच्या थंडीत त्यांना थोडा कफ होतो. नंतर आजींच्या खुडबुड चालू होते. बागेतील फुले काढणे, झोपाळयावर बसून हार करणे ही त्यांची नित्याची कामे. नंतर संगळयांवर नजरेची जरब ठेवणे, षिस्त लावणे ही त्यांची आवडती कामे.

अमेयदादा आणि मानिनी वहिनी. खरंतर, अमेयदादा म्हणजे अगदी रामासारखे आहेत (असे आजी म्हणतात बरं का!) आम्हा मांजरांना कसले कळतेस एवढे पुराणातले. पण एवढे मात्र सांगते अतिषय प्रेमळ आणि समजुतदार, आमच्या मानिनी वहिनीसारखेच. वहिनीनेच तर आणले मला माहेराहून. वहिनी मूळची सोलापूरची. अप्पासाहेब देषपांडयाची एकूलती एक मुलगी. माझ्यासारखीच आपल्या आईची लाडकी लेक. तिला सगळे तिकडे ‘मनू’ म्हणायचे. सगळे नुसता मानूचा शब्द झेलायला तयार. पण मानू मात्र माझ्या आईवर व माझ्यावर जीव टाकायची. मला टाकून कधी खायची नाही.

एक दिवस आप्पासाहेब बाहेरुन आले ते एकदम आनंदात. त्यांच्या आणि मानूच्या आईच्या खूप गप्पा झाल्या त्या दिवषी. मी तेव्हा खूप छोटी होते. बसले होते झोपाळयाखाली, मानूची वाट बघत. नंतर मला कळले की, ही सगळी गडबड मानूच्या लग्नाची होती. मी आईला विचारले, ‘‘आई लग्न म्हणजे काय ग?’’ आईने हसून मला जवळ घेतले, ‘‘अगं माणसांमध्ये तषी पद्धतच आहे. मुलगी मोठी झाली की, जाते

लग्न करुन आपल्या नव–याबरोबर कायमचं? 'हो कायमच.' मग मी पण जाणार मानूबरोबर. मी तिला ढुसक्या देऊन गुरगुरले. त्यानंतर काही महिन्यांनी मानूचे लग्न होऊन आली ईनामदारांकडे आणि मागोमाग मी पण. या बंगल्यात येऊन मानूची 'मानिनी' किंवा 'वहिनीसाहेब' झाली. बघता बघता मी इथलीच होऊन गेले. आणि मानूली 'वहिनी' म्हणू लागले.

अगं बाई, किती वेळ मी इथेच विचार करीत बसले आहे घरातील गडबड आता जाणवू लागली आहे. वहिनी आता येईलच इतक्यात मला उठवायला. ''षेवरीबाई, उठा आता. किती वेळ लोळत पडणार आहात? खाली येऊन दूध प्या.'' हया घ्या, आल्याच आमच्या वहिनीबाई.

वहिनी

''षेवरीबाई, उठा आता, किती वेळ लोळत पडणार आहात? खाली येऊन दूध प्या. शेवरी नं मी उठवल्या षिवाय उठतच नाही. नाहीतर माझ्या माहेरचं माझं आवडतं पिल्लू आहे ते. माझे माहेर सोडताना जितके वाईट वाटले होते त्यापेक्षा कितीतरी वाईट वाटते ते आता एक दिवसही माहेरी जायचे म्हटले की. खरंच, आपण बायका किती वेडया असतो. कधीही न पाहिलेले घर आपण एका क्षणात जवळ करतो. माझे लग्न झाले अमेयांषी आणि मी त्यांच्याषी आणि घराषी एकरुप होऊन गेले. फक्त लग्नाच्या आधी एक छोटीषी गडबड झाली. मला पहायला अमेय येणार होते त्या दिवषी. दारात षिरणारा राजबिंडा तरुण मी पहातच राहिले. पाहता क्षणी मला तो पसंत पडला. पण पुढच्याच क्षणी आई मला म्हणाली, 'अग, अमेय आता येतील एवढयात, पटकन नीट एकदा तयार हो पाहू.' म्हणजे आधी येणारा तो तरुण? तो अमेयचा धाकटा भाऊ 'अनुराग' हे मला नंतर कळले. दोघांच्यात कमालीचे साम्य होते. पण स्वभावातला फरक लग्नानंतर कळला. अमेय कमालीचे शांत, अबोल तर अनुराग बोलघेवडा. कोणत्याही विषयावर बोलण्यात त्याचा हातखंडा. माहेराहून अथे आल्यावर अनुरागने मला कधी तिथली आठवण येऊ दिली नाही. आमची अगदी चांगली गट्टी जमली आहे म्हणा ना! अमेय कधी चेष्टेने म्हणतात सुद्धा 'मानिनीने माझ्या भावाला माझ्यापासून पळवले आहे.' अगंबाई, मी इथेच काय रेंगाळत बसलेय? आता, सासूबाईची हाक कानावर येईल. 'मानिनी, सगळयांचा चहा ठेव पाहू तयार. चला रे सगळयांनी डायनिंग टेबलावर'.

सासूबाई (आई)

एवढा जीना चढून आले तरी हल्ली पाय दुखतात. एरवी पन्नास पन्नास माणसांचा स्वयंपाक एकटी करणारी मी. घरात एवढया माणसांचा राबता. पण गेले ते दिवस. आता चार माणसांचा स्वयंपाकही धड येत नाही माझ्याकडून. मानिनी सारखी सून

मिळाली म्हणून मी भाग्यवानच म्हणायची. पोरीने आल्यापासून सगळयांना आपलेसे केले आहे. तिनेच कषाला, तिच्या त्या पिल्लानेही सगळयांना लळा लावला आहे. माझा अमेयही काही कमी नाही हो गुणाने. मुलगा म्हणून, भाऊ म्हणून कधी कुठे कमी पडला नाही. दोघा भावांचे एकमेकांवर अतिषय प्रेम. एकाने फॅक्टरीच्या कामात लक्ष घातले एमबीए होऊन, तर दुसऱ्याने शेतीवाडी, इतर छोटेमोठे कारभार सांभाळले. अनुरागला लहानपणापासून फळाफुलांची आवड. घराभोवतालची बागही त्यानेच फुलवली आहे. हे तर म्हणतात, माझे दोन अनमोल मोती. अमेय–अनुराग. अगंबाई, सगळयांना बोलावयाला आले आणि मीच स्वतःषीच विचार करीत बसले. एव्हाना मानिनीने चहाची तयारी केली पण असेल.

आजचा दिवस खूप मस्त गेला. तळलेला बांगडा आणि कोलंबी. दोन्हींची चव अजूनही जीभेवर रेंगाळते आहे. खरंच, वहिनी जेवण एवढे मस्त करते. शेतावरल्या तळयातून आणलेले ताजे ताजे मासे. वहिनी एवढे कस्त कालवण करते. मियॉव. पंजाचा वास कितीतरी दिवस जात नाही. वहिनीला जेवण करावयला खूप आवडते. स्वयंपाकीण बाई आहेत पण त्या काय कामाच्या नाहीत. वहिनीचे जेवण म्हणजे अख्खे घर खूष. अमेय दादा, अनुराग दादा अगदी हात आडवा मारतात. आजोबा आजीही पचत नाही. असं म्हणतात पण हळूच जेवणावर चांगला ताव मारतात.

तुम्ही म्हणाल, ही शेवरी बरेच निरिक्षण करते की. अहो, पण मला दुसरे कामच काय आहे? माझी खिडकी, हे माझे रोजचे बसायचे ठिकाण. एवढया उंचावर फक्त मीच चढू शकते. इथे मी बसले आहे हे कुणाच्या ध्यानातच येत नाही. मी मात्र प्रत्येकाच्से उद्योग, आवडी निवडी, धावपळ मस्त आरामात बसून न्याहाळत असते. सकाळची न्याहारीची गडबड, सगळयांची आंघोळीची तडफड, कारखान्यात जायची गडबड हे ना ते. आजींची देवपूजेची घाई. आजोबांची वर्तमानपत्रे वाचण्याची घाई. अमेयदादा आणि अनुराग भैयाची बॅडमिंटन खेळायची घाई. वहिनींची सगळी कामे उरकण्याची घाई. माळयाषी गप्पाटप्पा. पुस्तकातल्या फेरी. संध्याकाळी गच्चीत फेऱ्या. रात्री अमेयदादा आणि वहिनींच्या झोपाळयावरील गुजगोष्टी. कधी लटके रुसवे फुगवे. पण खूप जीव टाकतात एकमेकांवर.

मानिनी (लागू)
अमेय तसे कितीही प्रेमळ असले, तरी स्वारीचा मूड कधी कधी असा बदलतो ना. सकाळी सकाळी असले वाचत. मी एकदम लाडात येऊन म्हणाले. ''हे काय अमेय, चला ना जरा माझ्याबरोबर गच्चीत. काय मस्त हवा आहे.'' मानू काय हे, मला कामं आहेत चिकार, तुला जायचं तर जा ना एकटी फिरायला.' असे म्हणून स्वारी

लागली पुस्तकांत डोकं खुपसायला. मी पण मग चिडले आणि तरातरा झोपाळयावर येऊन बसले. अमेयांना कधी कधी नाहीतच जमत रोमॅंटिक बनायला. तरी बरं अजून आम्ही दोनाचे तीन झालो नाहीत. मग मला वेळ तरी मिळेल का असे रोमॅंटिक वागायला? अय्या, हया विचाराने माझी मीच लाजले. हल्ली अमेय मला म्हणालेही दोनदा तीनदा.''मानू आता आपल्या लग्नाला तीन वर्षे होतील. आता दोनाचे तीन व्हायला तुझी काय हरकत आहे?'' त्या शब्दांचा रोख जाणून मला बाई क्षणभर लाजच वाटली. मला काय हरकत असणार? खूप गंमत वाटली. मी खुदकन हसले. त्याबरोबर अमेय क्षणभर माझ्याकडे रोखून पाहत म्हणाले, ''हसल्यावर किती गोड दिसतेस तू मानू? अषीच माझ्यासाठी हसत राहा. हो, पण तू तर सगळया घराची पहिली आणि मग या अमेयाची. माझ्यासाठी तुला वेळच कुठे आहे?'' हे ऐकून मी गंभीर झाले. खरंच आपण आपला वेळ अमेयांसाठी फार कमी ठेवतो. त्यातूनही ते कामात असले की, मग आपणच चिडतो. छे, चुकलेच माझे. आता यापुढे अमेयांचीच 'मानू' बनून रहायचे.

असाच विचार करीत असले होते झोपाळयावर आणि शेवरीच्या मऊ स्पर्षाने भानावर आले. ही शेवरीनं माझ्या प्रत्येक क्षणाला सोबत करते. माझे सुख, दुःख. सगळं सगळं जणू काही ही जवळून बघते. मला समजावते. ओंजारते, गोंजारते. ती आणि मी. कुठल्या जन्मीचे सोबती आहोत कुणास ठाऊक? हल्ली किती पोक्त झाली आहे. आतापर्यंत माझ्या पायात इकडून तिकडे उडया मारीत नाचणारे पिल्लू. एका पोक्त, समंजस मांजरीमध्ये बदलताना पाहून मी अचंबित झाले. आपण स्त्रिया. सगळयाच स्त्रिया पण नाही का अषाच होतो. प्रथम अल्लड, कुमारिका, नंतर सुंदर स्त्री आणि मग समंजस, प्रौढ, पोक्त प्रौढा. लग्न झाल्यावर सगळंच बदलून टाकतं आपल्याला, नाही!

सासूबाई

कालच अष्टविनायक यात्रेला जाऊन आलो. काय सुंदर दर्षन झाले गजाननाचे. मानिनीचे आग्रह करुन पाठवले म्हणून गेलो. गेल्यावर्षी चारधाम केले. पोरांमुळे आत देवदर्षन होते आहे बरं का! अनुराग म्हणतो आई—बाबा आता आराम करा. अमेय म्हणतो आई—बाबा देवदर्षन करा. बाबांनो, आम्ही आता थकलो. म्हणून आता लवकर आमच्या मांडीवर एखादं नातवंड येऊ दे. अनुराग तर एवढयात लग्न करणार नाही म्हणतो. म्हणतो आपली शेतीवाडी, पिके मला तांत्रिक दृष्टया प्रगत करायची आहेत. निरनिराळे प्रयोग करुन बघायचे आहेत. कर बाबा, हवे ते प्रयोग कर. उगीच नाही आपली द्राक्षे, चिकू बाजारात अव्वल दर्जावर उपलब्ध आहेत. तिकडे तो अमेयही कारखान्याचे काम अगदी उत्कृष्ठ सांभाळत आहे. ह्यांना तर आता अगदी कधीतरी कारखान्यात जावे लागते. आपले सॉस, जॅम अगदी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत नाव

कमावून आहेत. दोन्ही पोरांनी आणि सूनेने अगदी तिन्ही आघाडया उत्तमपणे सांभाळल्या आहेत. मला म्हातारीला आणखी काय पाहिजे. एक बाळकृष्ण मात्र आणा बाबा लवकर माझ्या मांडीवर खेळायला.

शेवरी
हल्ली हल्ली शेजारचा 'मन्या' त्यांच्या गच्चीतून अगदी माना वेळावून बघतो मेला. शेवटी मला पण त्याच्याकडे बघून हसू आले. तर तिथूनच म्हणतो कसा, 'हसताना तू खूप गोड दिसतेस.' मग मी पण अषी लाजले ना. 'ए माझ्याषी मैत्री करषील का ग?' मी काहीच न बोलाता पटकन उडी मारुन घरी आले. मन्याचाच विचार करत होते दिवसभर. गोल गोबऱ्या गालांचा, लांब मिषा, तिने डोळे, रुबाबदार चालणे. सोनेरी तपकरी अंग, अंगभर निळे डोळे. आवडतो मला मन्या, परवा झोपेनही तो दिसत होता. वहिनी मला म्हणाल्याही, ''काय गं, झोपेत काय उंदीत पकडत होतीस?' त्यांना काय सांगू मन्या दिसत होता म्हणून. पण हल्ली नं वहिनी खूप विचारात दिसते. कसला बरं विचार करीत असेल ती? परवा आजाबाईना मी त्यांच्याषी बोलताना ऐकले. काहीतरी बाळकृष्ण वगैरे बोलत होत्या. मला बाई काही कळले नाही. आणि कळणार तरी कसे! समोर एक उंदीर पळत होता त्याला पकडायला धावले.

मानिनी
सासूबाईंनी पुन्हा एकदा विषय काढला म्हणून मीही आता विचारात पडले. खरं तर आमचे प्लॅनिंग वगैरे काहीच नसताना जवळ जवळ तीन वर्षे बाळराजाने हुलकावणी दिली होती. कुठेतरी काहीतरी चुकत होते. शेवटी न राहवून मी आणि अमेय डॉक्टर लिमयांकडे गेलो. आमच्या सर्व तपासण्या झाल्या. रिर्पोटस दोन दिवसांनी मिळतील असे सांगण्यात आले. हे दोन दिवस अगदी अगदी खूप टेन्षन मध्ये गेले. आईना आम्ही काहीच सांगितले नव्हते. उगीच म्हातारपण कषाला टेन्षन. आज तिसरा दिवस. शेवटी जो निकाल लागेल तो स्वीकारायचा याची मी मनाची तयारी केली. अमेय बिचारे खूप काळजी करीत होते. म्हणून स्वतःच ते डॉक्टरांना भेटायला गेले. परत आले तेव्हा त्यांना चेहरा बघून मला धक्काच बसला.

नेहमीचा रुबाबदार चेहरा अगदी काळवंडून गेला होता. खांदे पडलेले होते. माझ्या मनातील शंका खरी ठरली. परमेश्वराने एवढया रुबाबदार, कर्तबगार माणसात काही त्रुटी ठेवली होती. मुलाला जन्म देण्यात पुरुषातलाच बी पेरावे लागते. जर बियाणेच कमजोर असेल तर पीक कसे उगवणार? मी अमेयांना तुटलेल्या मनाला कसेबसे सावरुन धीर देऊ लागले. कधी कधी विचार येई हा दोष माझ्यात असता तर अमेयांनी कसे रिॲक्ट केले असते? पण ही वेळ असले विचार करीत बसण्याची

नव्हती. परमेश्वराने खरंच आपल्याला किती पराधीन बनवले आहे. आपल्या हातात फक्त त्याचा निर्णय स्वीकारणे एवढेच असते. नाहीतर एवढया सुदृढ आणि सुखी असणाऱ्या आम्हाला का बरे अपत्य सुखापासून वंचित रहावे लागणार होते?
खरा प्रष्न पुढेच होता. आईबाबांना हे सगळे कसे सांगायचे? त्यांच्या बयाकडे बघून सध्यातरी आम्ही त्यांना न दुखवण्याचा निर्णय घेतला.

काळा हा नेहमी आपल्या वेगाने पुढे जात असतो. अमेय हल्ली कारखान्याच्या कामात खूपच व्यस्त असतात. कदाचित मनातले नैराष्य लपवून कुठेतरी विरंगुळा शोधत असावेत. त्यांना वरचेवर बाहेरगांवी जावे लागे. अनुरागनेही फळबागांत, शेतीत वेगवेगळे प्रयोग यषस्वी करुन आमची उत्पादने वाढवली होती. त्यांच्या कर्तबागारीचे तेज त्यांच्या सुंदर चेहऱ्यावर झळकत असे अलीकडे. दोघे भाऊ आपापल्या क्षेत्रात झळकत होते. खानदानीपण, आदब दोघांच्याही दिसण्यात, वागण्यात ओतप्रोत भरलेली होती. खरचं, सासूबाई किती भाग्यवान! माझ्या छातीत एक बारीकषी कळ उठली. का मला अषी मातृसुखापासून वंचित ठेवायची षिक्षा? एकटी असले की, डोक्यात अनेक प्रष्नांचे किडे वळवळत.

आणि....... आणि एक संध्याकाळ माझ्या आयुष्यात अषी उगवली की, माझे आयुष्य नीतीमूल्यांा झुगारुन एका वेगळयाच वावटळीत पालापाचोळयासारखे उडाले. अमेय कारखान्याच्या कामसाठी बाहेरगावी गेले होते. आईबाबांना आम्ही फाषी काषी विश्वेश्वराला पाठवले होते. माझी मानसिक अवस्था आंदोलनात्मक सुखदुःखाच्या हिंदोळयावर वरखाली होत होती. सगळी कामे आटपून मी खोली जाऊन पडणार तेवढयात अनुराग आल्याचे कळले. आज जेवायला घरी आला म्हणून मी स्वतः विचार केला, बिचाऱ्याची विचारपूस करावी. स्वतः जेवायला वाढावे. बघितले तर थकलेला दिसत होता. मी त्याला पाणी दिले आणि जेवायला वाढू का विचारले. नेहमीप्रमाणे मोकळे हसून त्याने मान डोलावली. तो फ्रेष होऊन येईपर्यत मी जेवणाची तयारी केली. त्याची आवडती गझल लावली. तेवढयात तो छान फ्रेष होऊन आला. गप्पा मारीत जेवणाची तारीफ करीत जेवू लागला. किती छान दिसतो हा. वागणेही किती दिलखुलास. मी नकळत त्याचे निरिक्षण करीत होते. वेळ कसा निघून गेला कळलेच नाही. माझ्या आणि त्यांच्या आवडीनिवडी गप्पा टप्पा अगदी एकसारख्या. माझा बालमित्रच जणू. ‘दिले नांदा तुढझे हुआ क्या है।’ माझ्या मनाला नकळत कसली तरी हुरहूर लागली होती. अनुराग ही अगदी मूडमध्ये दिसत होता. मला म्हणाला, ‘‘मानिनी, आज खूप छान गप्पा मारल्या आपण. मनावरचा ताण सगळा नाहीसा झाला बघ. जा आता झोप. आज दादाही नाही. दिवसभराच्या कामाने दमली असषील. गुडनाईट.’’ मी बरं म्हणून वळले आणि जीना चढू लागले. तेवढयात कसा कोण

जाणे पण माझा तोल गेला. माझा पाय घसरला. मी मोठयाने अनुरागला हाक मारली. अनुराग पुढल्याच क्षणी आला मला आधार द्यायला आणि त्याच्या मजबूत बाहुपाषांनी मला हळूवार आधार दिला. माझ्या मनाचा बांध सुटला आणि मी तो आधार आणखी घट्ट धरुन ठेवला. त्याचवेळेस भारनियमनामुळे लाईट गेले. माझे मन आणि शरीर मला न जुमानता माझे राहीलेच नाही.

पहाटे मी जागी झाले. तेव्हा एक माठे वादळ येऊन गेले होते. माझ्या खोलीचा दरवाजा वाऱ्याने पुढेमागे आपटत होता. माझ्या डोक्यातील विचारही धाडधाड एकमेकांवर आपटत होते. एका क्षणात, एका नाजूक क्षणात हे मी काय करुन बसले? आत्तपर्यंत फक्त अमेयांषी एकनिष्ठ असलेले माझे मन आणि शरीर एका बेसावध क्षणी मला गुंगारा देऊन निसटले होते. मी एवढी कमकुवत कषी झाले? का माझ्या मनात कुठेतरी सुप्त असलेली इच्छा उसळून आली? शी! विचार करुन डोके भणभणले. कसेबसे स्वतःला सावरीत आंघोळीला गेले. तयार होऊन खाली आले. तेव्हा घरभर एक सन्नाटा जाणवत होता. नेहमीचेच माझे घर आज माझ्याकडे वेगळयाच नजरेने बघत होते. सुन्न होऊन मी तिथल्याच एका सोफ्यावर बसून राहीले. स्वयंपाकीण बाईंनी मला चहा आणून दिल्यावर मी भानावर आले. वहिनीबाई काय झाले? बरं नाही का? चहा घ्या जरा, बरे वाटेल तुम्हांला?'' ''अनुराग कुठे आहेत?'' मी कसेबसे त्यांना विचारले. ते तर मघाषीच बाहेर पडले बघा. कुठे जातो काहीच सांगून गेले नाहीत.'' थोडया वेळाने मी त्याच्या खोलीत गेले. टेबलावर एक चिठ्ठी होती. 'मानिनी, काल जे काही घडले त्याबद्दल जमले तर मला क्षमा कर. लवकरच कॉलफोर्नियाना जाणाचा विचार करीत आहे. आई, बाबा आणि अमूची काळजी घे.''

अनुराग

माझ्या हातून तो कागद गळून पडला. मनावरील ताण असह्य होऊन मी खाली पडले. कोणाच्यातरी मऊ स्पर्षाने मी जागी झाले. शेवरी माझ्या पायाला अंग घाषीत होती. तिच्या मायेने मला एकदम रडू फुटले. शेवरीला घट्ट छातीषी धरुन मी हमसाहमषी रडू लागले.

ष्शेवरी

त्या दिवसापासून वहिनीचे चित्त थाऱ्यावर नाही. खूप उदास असते बिचारी. हो, तो दिवस, ती संध्याकाळ ज्या क्षणाची मी एकमेव साक्षी आहे. मला वाईट वाटले ते वहिनीचे. कुठे आणि कषी चुकली ती? तिचे संस्कार, तिची एकनिष्ठता. कुठे गेले सगळे माणसांचे विचार? खरंच, चुकली का ती? आणि चुकली तरी चूक का तिच्या एकटीची आहे? ती वेळच तषी होती. मला माणसांएवढी बुद्धी नसेल कदाचित पण मी सुद्धा एक मादी आहे. मलाही भावना आहेत. मलाही वहिनीने केलेले संस्कार आहेत.

मलाही माणसांमध्ये राहून त्यांच्या भावना कळतात. षिवाय जे घडून गेले ते गेले. 'वहिनी, आता नको एवढी दु:खी होऊस. जे घडणार असते ते कधीही टळत नाही. तो परमेश्वराचाच निर्णय असतो, असे तूच म्हणतेस ना वहिनी? मग हेही परमेश्वराचेचे विधिलिखित आहे असे समज.'
अगं बाई, आज खूप दिवसांनी अमेयदादा वहिनीच्या खोलीत आलेले दिसतात. काय करेल आता वहिनी? सांगेल का आपलं मन मोकळं करुन? मला तर वाटतं वहिनीने सत्य झाकावे. कधी कधी सुर्याच्या प्रखर तेजाने हिरवी लव्हाळी जळून जातात. त्यामुळे सत्यतेही दाहक सत्य असत्याच्या आड लपवले तर वहिनीचा संसार, माणसे सगळी सगळी यात होरपळण्यातून वाचतील.
मानिनी
अमेयांना पाहून मी दचकले, गोंधळले. त्यांच्याकडे बघून मला एकदम उमाळा आला आणि न राहवून मी त्यांच्या गळयात पडले. अमेयांना वाटले खूप दिवसांच्या विरहाने माझी अषी अवस्था झाली आहे. मी त्यांना काही सांगण्याचा प्रयत्न करीत असतानाच त्यांनी माझे तोंड बंद केले. अमेय परत आल्यापासून माझ्यावर अगदी प्रेमाचा वर्षाव करीत आहेत. 'मानू, तुझी ही काय अवस्था झालीय? अगं, एवढं काय ते मनाला लावून घेतेस? आता आलोय ना मी.' मी अमेयांच्या सुखाचा विचार करुन मनात उसळणाऱ्या विचारांना थोपवून ठेवले. कामाला जुंपून घेतले.
अगंबाई, पण हे मला काय होतेय? सकाळी उठल्यावर डोळे उघडते तर खोली गरगर फिरतेय. स्वयंपाकीणबाईंनी फोडणी टाकली की, मला भडाभडा उलटी होतेय. परवा सासूबाईंनी माझ्याकडे शंकेने बघितले पण मी काही नाही म्हणत बाहेर पळाले. विचारांच्या तंद्रीत माझी पाळी येऊन दोन महिने झालेत हे लक्षातच आले नाही. म्हणजे ही कसली लक्षणे आहेत? देवा, माझी ही कसली परिक्षा पाहतो आहेस? येणाऱ्या सुखाचे स्वागत मी कसे करु? ज्या सुखासाठी मी तळमळत होते ते सुख माझ्यापुढे असे विष कालवून उभे ठाकले आहे. खात्री करुन घ्यायला डॉक्टरांकडे गेले आणि त्यांनी चक्क माझे अभिनंदन केले. ''वहिनी, अभिनंदन. तुमच्याबाबतीत दैवाने चमत्कार दाखवला आहे. अषी केस हजारात एखादीच असते. तुम्ही आई बनणार आहात.'' मी कसंनुसं हसत मटकन खुर्चीत बसले. डॉक्टरांनी लगेच अमेयांना फोन लावला. अमेय ताबडतोब मला न्यायला आले. त्यांच्या चेहऱ्यावर आंनद ओसंडून चालला होता. त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू पाहून मी माझे आसू लपवले.

घरी पोचलो. बघते तर आई बाबांच्या उत्साहाचे कारंजे थुईथुई नाचत होते. सारे घर आनंदाच्या पिवळया उन्हात न्हाऊन निघाले होते. मनाच्या दोलायमान अवस्थेत मी खोलीत आले. बघते तर काय शेवरीने सुंदर सुंदर दोन पिल्लांना जन्म दिला होता. तिच्या कापसासारख्या गोळयांना बघता बघता माझ्या हृदयात मातृभावना उचंबळून

आली. मी अलगद माझा हात पोटावर ठेवला. पोटाचा फुगीरपणा जाणवला. ‘या दुनियेत येणाऱ्या लहान जीवा मी तुझी आई तुझे स्वागत करते आहे. तू फक्त माझा आहेस. इनामदार कुटुंबाचा वंषज आहेस. तुला पाप पुण्याची कार्य पर्वा? या शेवरीच्या अजूनही डोळे न उघडणाऱ्या पिल्लासांरखा तू अश्राप, निरागस आहेस. माझ्या चुकीचे प्रायश्चित म्हणून मी तुला षिक्ष का देऊ? हे अक्षम्य पाप मी नाही करणार. मी तुला जन्म देईन. वाढवीन. या शेवरीची शप्पथ.’’ माझे डोळे पाणावले. शेवरीच्याही डोळयात पाणी तरळल्याचा मला भास झाला. तिनेही हुंकारुन आपल्या पिल्लांना कुषीत घेतले.

(श्री अक्षरधन आयोजित सौ. इंदिराबाई वसंत जोषी
राज्यस्तरीय कथा स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त कथा)
❤❤❤

## २ अग्निदिव्य

सीते अगं सीते आईच्या जाडया भरडया जोरदार हाकेने सकाळी लवकर जागी झाले. आईचे हे बोलणे असेच नेहमी जाडे भरडे, कोमलपणाचा मागमूसही नसलेले. आयुष्यात खाल्लेल्या टक्केटोणप्यांनी तिच्यातील कोमलपणा, हळूवारपणा पूर्णपणे गेला आहे. आईच काय इथे राहणारी सगळीच माणेस, भसाडया, कणखर आवाजात बोलणारी, नळावरची भांडणे, भांडयांची आदळआपट, पोराटोरांची मारामारी, बायकांची हमरीतुमरी एक ना अनेक असंख्य आवाज. कोलाहल. येथे राहणारा प्रत्येक माणूस कषाने तरी पिडलेला आहे, त्रासलेला आहे. टीचभर दोन खोल्या. सार्वजनिक संडास. मधूनच पाण्याचे दर्षन देणारा नळ. दरवाजा खुराडयातील बाबू, निलू, महेष, मी आणि आई. अभ्यास कधी आणि कसा करु? पहाटे पहाटे उठून जमेल तेवढा अभ्यास केला. घरात आईला मदत केली आणि मीनाताईच्या बंगल्यावर गेले. काटया कुटयातून ठेचकाळताना, मऊ मखमली गलिच्यावर पाय पडावा असे झाले. तिथल्या शांततेने मन हिरवेगार झाले. प्रषस्त खोल्या, सर्व खोल्यातून भरुन राहिलेला मंद सुगंध, उंची फर्निचर, झुळझुळीत भारी पडदे, ह्या वातावरणाने मन मंदधुंद झाले.

डोळयातील गोंधळ कमी झाला. बंगल्यात माणसे इनमीनतीन. मीनाताई, यजमान सुभाषदादा आणि त्यांची लाडकी लेक मैथिली. माझ्याच नावाचे दूसरे रुप. पण आमच्या भाग्यात आणि दिसण्यात परमेश्वराने खूपच डावे, उजवे केलेले. ती गोरी, उंच, देखणी. मीनाताई, लाडाने तिला परी म्हणतात. तिच्या सुंदर लांब बोटाकडे बघताना माझ्या कणखर आणि ओबडधोबड हातांची आठवण होते. तिच्या सळसळीत सोनेरी केसांची भूरभूर बघताना नकळत माझा हात रुक्ष केसांकडे जातो. ती तोंडात चांदीचा चमचा घेऊन जन्मलेली आणि मी चमचाभर दुधालाही महाग झालेली असो. परमेश्वराने केलेल्या या तफीवतीपुढे माझी कोणतीच तक्रार नव्हती. याला कारण माझी आई. खूप जीव टाकते ती माझ्यावर. दुसरे कारण म्हणजे मीनाताई. खूपच लाड करतात त्या माझे. माझ्यावर मुलीपेक्षा जास्त प्रेम करतात.

बंगल्यावरची कामे आटपून जेवून शाळेत जायचे हा माझा नित्यक्रम. शाळेतून यायला सहा साडेसहा वाजतात. कोपऱ्यावरती टवाळ मुले खूप त्रास देतात. महेषचा मित्र प्रकाष तर खूपच टारगटपणा करतो.

मैथिली

पहाटे पहाटे खूप सुंदर स्वप्न पडले. सुंदर, सोनेरी आभाळ. त्यामध्ये मस्त इंद्रधनुष्य पडलेले. ते पकडायला मी धावत होते. धावता धावता कषालातरी अडकून पडले आणि आईची हाक कानावर आली. आई, नको त्या वेळी नेमकी तडमडते. एवढी कसली घाई असते तिला अभ्यास कर ना ते कर ना ते कर. हल्ली तर त्या सीतेवर खूपच खुष असते. जषी काय तिची सख्खी मुलगीच. सीतेला म्हणू खूप चांगले मार्क्स पडले दहावीला. मिळू दे ना ीव बंतमे! तिच्यासारखे काकूबाई होवून मला मुळीच रहायचे नाही.

सीता

परिक्षेचा रिझल्ट जस जसा जवळ येऊ लागला तसतसा जीव घाबरा होवू लागला. खरंच, या निकालावर माझे सगळे भविष्य अवलंबून होते. मीनाताईंना पण माझ्याकडून खूपच अपेक्षा होत्या. मला म्हणाल्या, 'सीते, तू जर दहावीत चांगले मार्क्स मिळवलेस तर कॉलेजचे षिक्षण माझ्याकडून.' खरंच कित्ती कित्ती चांगल्या आहेत त्या. कोण कुठली मी लहानपणापासून त्यांच्याकडे काम करायला लागते काय आणि त्या मला आईसारखे पोटाषी धरतात काय? कसले जन्मोजन्मीचे ऋणानुबंध आहेत, देवालाच ठाऊक? मीनाताई, तुमचे हे उपकार आणि माझ्यावरचा विश्वास मी खरा करुन दाखवीन.

एकदाचा रिझल्ट लागला आणि मी हवेतच तरंगायला लागले. इतके चांगले मार्क्स मिळतील असे स्वप्नातही वाटले नव्हते. आईने माझ्यावरुन मीठ मोहरी ओवाळली. देवापुढे साखर ठेवली. रिझल्ट घेऊन मीनाताईकडे गेले. त्यांच्या पायावर डोके ठेवले. त्यांना भरुन आले. म्हणाल्या, 'चल, आता तुला सर्वोत्तम कॉलेजात ॲडमिषन द्यायची जबाबदारी माझी. पुढचे सगळे चांगलेच होईल.

मैथिली

दुपारी कॉलेजमधून घरी आले, पुस्तके सोफ्यावर फेकली आणि मस्त एसीच्या गारव्यात झोपून गेले.

खरंच कॉलेजचे दिवस मस्त, मुलायम रंगीबेरंगी फुलपाखरांच्या पंखासारखे. त्यांचा मखमली स्पर्ष कसा मनाला सुखावून जातो असं वाटते. हे दिवस कधी संपूच नयेत. खूप खूप मैत्रिणी, मित्र, चेष्टामस्करी, बिनधास्त फिरणे. खोटी खोटी भांडणे, लेक्चर चुकवून पिक्चर पाहणे. नाटकं, डोळयात पाणी येऊन ठसका लागेपर्यत खाल्लेली भेळपुरी, पाणीपुरी, सगळं सगळं हवेहवेसे वाटणारे.

कसली तरी हवीहवीषी वाटणारी सुखद भावना. तुषारकडून मिळालेले लाल गुलाब. तो बघून माझ्याच गालावर गुलाब फुटले.तुषार तू माझ्यावर कसली जादू टाकली आहेस? एक नषा चढली आहे. माझ्या तनमनावर. जेव्हापासून तू भेटलास, माझ्या जगण्याचा अर्थच बदलला आहे. आय लव यू, तुषार.

सीता

कॉलेजजीवन हे कुणाला रम्य वाटतही असेल. पण मला मात्र परिस्थितीमुळे त्याच्याकडे अगदी त्रयस्थपणे पहावे लागले. या पाच वर्षात, दिवस रात्र स्वप्न. एकच ध्येय. कसेही करुन ग्रॅज्युएट व्हायचे. चांगले मार्क्स मिळवायचे. जितके षिकता येईल तेवढे षिकायचे. काटकसर करुन रहायचे. कुठल्याही मोहाला बळी नाही पडायचे. कधी कधी वाटायचे पण, खूप मजा करावी. सगळी बंधने तोडून टाकावी असे क्षण पुष्कळदा आलेही. पण मग डोळयांसमोर. आला तो आईचे चेहरा. निलू, महेष यांची जबाबदारी नाही, आपण आपल्या निश्चयापासून ढळायचे नाही. मीनाताईंना दिलेल्या शब्दापासून घसरायचे नाही. समाजात मानाने, ताठ मानेने जगायचे. आपल्या कुटुंबाला समाजाच्या उच्च स्तारात आणायचे.

एक दिवस माझे हे स्वप्न पुरे झालेत्र मी ग्रज्युएट झाले. मीनाताईच्या ओळखीमुळे मला एका चांगल्या कंपनीतून ऑफर आली. त्या कंपनीत सुपरवायझर म्हणून मी लागले आणि माझ्या घरी आनंदीआनंद पसरला. मीनाताई म्हणाल्या, 'आईचे पांग फेडलेस. अषी मुलगी फार नषिबाने मिळते. अजून खूप शीक मोठी हो सुखी हो.' मीनाताई तुमच्यासारखी देवी आयुष्यात नषिबाने भेटते. तुमच्यामुळे मी आज इथपर्यंत येऊन पोचले. तुम्ही मला आजपर्यंत केलेली मदत जर मी विसरले तर माझ्यासारखी करंटी मीच. हल्ली आईला नेहमीसारखी कामे होत नाहीत. निलूची बारावी पुरी होईल. आमच्याकडे बघून वाडीतला प्रत्येकजण कौतुकाने मान डोलावतो. याचे सारे श्रेय मीनाताई तुम्हांलाच जाते.

चांगली नोकरी मिळाली आणि घरी चार सुखाचे घास जाऊ लागले. हे सुख शरीरावर दिसू लागले. कधी नाही तो आरसा माझ्याकडे बघून हसू लागला. पण या खुललेल्या रुपामुळे वाडीतल्या टारगट मंडळींना नवीन खेळ मिळाला. माझ्या जाण्यायेण्याच्या वाटेवर प्रकाष आणि त्याचे टारगट मित्र नसते चाळे करत उभे राहू लागले. मी दुर्लक्ष करते त्यांच्याकडे पण कधी वाटते या गचाळ वस्तीत आपल्या अब्रुला आपण किती दिवस आणि कसे जपायचे? अष्लील चित्रे बघणारी, दारु पिणारी, जुगार खेळणारी वस्ती. मला निलूचीही काळजी वाटते. बाबू आणि महेष

यांना या सगळयापासून दूर ठेवायचा आटोकाट प्रयत्न करते. असे वाटते या सगळयांपासून दूर उच्चभ्रू समाजाचे, बंगल्यामधील आयुष्य किती सुखी आहे? मैथिलीचे आयुष्य तर एखाद्या सुंदर गुलाबासारखे, सुरक्षित बागेत बंदिस्त आहे. आपण मात्र रस्त्याच्या कडेला वाढणाऱ्या उघडयावागडया कोरांटीसारखे आहोत.

मैथिली
'जीवन गाणे गातच रहावे. आले गेले विसरुन जावे पुढे पुढे चानलावे' बाथरुममध्ये वॉष घेताना हे गाणे मी गुणगुणत होते. आयुष्य कसे भरभरुन लुटावे. माणसाने सगळे शौक पुरे करावेत. आज आहे तो क्षण आपला. पुढचे कोणी पाहिले आहे? अरे यार, उठा मजा करा. आयुष्य धुंदीत जगा. मम्मा म्हणते मैथिली, अभ्यासाकडे लक्ष दे. अगं, मम्मा अभ्यास तर मी करीनच. पण मला माझे आयुष्य मजेने उपभोगू दे. षिवाय पुस्तक डोळयासमोर धरले की तुषार डोळयासमोर येतो. मग माझे लक्ष कसे लागणार अभ्यासात? मम्मा, तुझी सीता तुझ्या मनासारखे वागते ना! सती सावित्रीचा वसा घेतला आहे तिने. चालवू दे बिचारीला.

सीता
कंपनीत साहेब आणि इतर सहकारी माझ्या कामावर खुष आहेत. पहिला पगार मिळाल्यावर दोन सुंदर साडया घेतल्या. एक मीनाताईला आणि एक आईला. पहिली मीनाताईकडे गेले. त्यांच्या पायावर डोके ठेवले. त्यांना भरुन आले. मला म्हणाल्या पुढे षिकून घे. कॉम्प्युटरचा डिप्लोमा घे. मी त्यांच्याकडे पाहतच राहिले. अगं, बघतेच काय अषी. मी सांगितले न तुला पुढे षिक म्हणजे षिक. मी म्हणाले, 'पण एका अटीवर. माझी नोकरी मात्र चालू ठेवणार.' ते. त्या दिवसापासून माझे पुढील षिक्षण, नोकरी चालूच राहीली. रात्री यायला उषीर होई. एकदा प्रकाषने रस्त्यात गाठलेच. आधी मी दचकले. पण नंतर माझ्यात दुर्गाच अवतरली. अषी काही त्याच्या थोबाडात ठेवून दिली. की बस. त्याला जोरात ठणकावले, 'खबरदार, पुन्हा माझ्या वाटेने गेलास तर. आज थोबाड दिसते तरी आहे. उद्या असा काही नकाषा बदलीन तुझ्या चेहऱ्याचा की जगाच्या पाठीवर तुझे थोबाड परत कोणी बघणार नाही.' तेव्हापासून प्रकाष माझ्या वाटेने सोडाच पण माझ्या गल्लीतही परत दिसला नाही. आज वर्षाचा शेवटचा दिवस. हे संपूर्ण वर्ष पंख लावून वेगाले आले तसे गेले. आयुष्यात एवढी गती मी कधीच अनुभवली नव्हती. आत्तापर्यतचा मिळालेला भाकरतुकडा हा खूप खूप कष्टाने मिळत होता. पण गल्ली मात्र सुग्रास भोजन दोनवेळा नाही तरी एकवेळ नक्कीच मिळू लागले होते म्हणूनच तर माझ्या नवीन कामाला मी अक्षरषः वाहून घेतले होते. सचोटी, सफाई आणि तत्परता यांची साथ धरुन होते. याचा परिणाम म्हणून मला कायम स्वरुपाची नोकरी मिळाली होती.

©माझ्यामना ई प्रकाशन

पण एकीकडे कामाचा बोजाही वाढत होता. आज वर्षाचा शेवटचा दिवस असूनही, घडयाळाचा काटा रात्री दहावर आला तरी माझे काम पूर्ण झाले नव्हते. बाकीची लोकं अर्ध्या दिवसाची सुट्टी घेऊन किंवा थोडीषी लवकर निघून गेली. काहींनी विचारलेही, 'सीता येतेस का गं आमच्याबरोबर. नवीन वर्षाचे सेलिब्रेषन करायला? मी हसून नकार दिला. कारण मला कामं आटपून त्वरीत घरी पोचायचे होते. शेवटचा डेटा फिट करुन मी ड्रॉवरला लॉक घातले. गणेषला ऑफिस बंद करायला सांगून, पर्स उचलून खाली येईपर्यत रात्रीचे साडेदहा वाजले होते. सासरची गल्ली अंधारली होती. बहुतेक सर्व ऑफिसेस बंद झाली होती. मी झपझप चालत गल्लीच्या टोकाषी आले तर एक जोडपे एकमेकांना चिकटून पुढे चाललेले दिसले. नवीन वर्षासाठी सेलेब्रेषन चालू झालेले दिसते. दोघेही तोल सावरत एकमेकांषी हसत खिदळत होती. तेवढयात समोरुन येणाऱ्या गाडीचा उजेड त्या जोडप्याती तरुणीच्या चेहऱ्यावर पडला. मला केवढयांदा दचकायला झाले. माझ्या हृदयाची स्पंदने वाढली. मैथिलीला कधी काळी हया अवस्थेत बघायला लागेल असे मला स्वप्नातही वाटते नव्हते. तिने मद्य घेतले होते. केस आणि कपडे अस्ताव्यस्त झाले होते. मैथिलीची ही अवस्था कोणी केली होती? तिच्याबरोबर असणाऱ्या तरुणाने की ती स्वतःच या प्रकराला जबाबदार होती? मी सावध झाले, मला मीनाताईंची आठवण झाली. मीनाताईचा ठेवा आज संकटात होता. त्यांच्या परीला दुष्ट राक्षसांनी घेरले होते. तिला वाचवायलाच हवे. माझ्या डोक्यात असा विचार चालू असताना त्या तरुणाने अंधाराचा फायदा घेऊन मैथिलीला खाली ढकलले होते आणि तो तिच्यावर बळजबरी करत होता. मैथिली अर्धवट नषेत त्याला विरोध करत होती. हे बघून माझ्या जीवाचा संताप संताप झाला. मी वेगाने जाऊन त्या तरुणाचा दंड पकडला आणि जोराने त्याची मान वळवून खाडकन थोबाडीत लगावली. सतत करत असलेल्या कष्टाने माझे हात आणि मनही कणखर झाले होते. घाबरलेल्या तरुणाच्या मी आणखीन दोनचार थोबाडीत लगावल्या.

अनपेक्षित झालेल्या हल्याने तो तरुण कोलमडला. मी मैथिलीला ओरडून सावध केले. तिलाही दोनतीन थोबाडीत लगावल्या. त्यामुळे मैथिली थोडीफार भानावर आली. वचकून माझ्याकडे पाहू लागली. मी पुन्हा त्या तरुणाची कॉलर पकडून त्याच्यावर हल्ला चढवला. त्याबरोबर आधीच गर्भगळीत झालेला तो तरुण पाठ दाखवून पळून गेला.

मी मैथिलीला उठवले. 'मैथिली, अगं ऊठ. आता तरी सावध हो. डोळे उघड. चल घरी जाऊ या.' माझ्या शब्दाने अर्धमेली झालेली मैथिली निमूटपणे माझ्या मागे चालू लागली. कधीही वाट न चुकण्यासाठी.

मीनाताई
सीते, आज माझ्या मैथिलीला तू चुकीच्या वाटेवरुन घरी परत आणलेस. हा थोरपणा, समंजसपणा तुला कोणी षिकवला. स्वतः चिखलात वाढून तू एखाद्या कमळासारखी पवित्र राहीलीस आणि माझी मैथिली शी! रामायणातल्या सीताने अग्नीपरिक्षा देऊन स्वतः पवित्र असल्याचे सिद्ध केले. पणूतू, तू तर अग्नीपरिक्षा देऊन माझ्या मैथिलीचे पाविन्र्य राखलेस.

धन्य धन्य ती सीता
धन्य धन्य ती माता
आज राखली लाज तू माझी
दे अग्नीदिव्य करता

❤❤❤

# ३ पैंजण

''नमू, अगं बादली भरुन वहायला लागली की आटप लवकर, लक्ष कुठय तुझ?'' शेजारची मंजू कर्कष किंचाळली, तेव्हा कुठे नमू भानावर आली. दचकून तिने आजूबाजूला बघितलं तर पाण्यासाठी जमलेली गर्दी बरीच वाढली होती. घामेजलेल्या बायका कमरेवर, हातांवर, डोक्यावर कळषा, बादल्या, भांडी घेऊन पाण्याच्या करंगळीएवढया धारेकडे आषाळभूतपणे बघत होत्या. गुळाभोवती घोंघावणाऱ्या माषांसारख्या नमूने आणखी एक क्षणही उषीर केला असता तर नक्कीच ती त्यांच्या संतापाला बळी पडली असती. तिने घाईघाईने पाण्याचे भरलेली बादली आणि कळषी उचलली आणि गर्दीतून वाट काढत बाजुला आली. हातातलं ओझं कसंबसं सांभाळतं लगबगीने घराकडे चालू लागली. दुडक्या चालीमुळे आणि हातातल्या ओझ्यामुळे तिला धाप लागली होती. डोक्यातले विचारही वेगाने चालू झाले. तिच्या डोळयासमोर ती राहत असलेल्या टिचभर खोलीचे चित्र आले. खोलीच्या कोपऱ्यात मातीची चूल आणि कषीबषी एकावर एक रचलेली जर्मनची भांडी. त्याच्या बाजुला एक मोरी. त्या मोरीत फक्त नावालाच असलेला नळ, त्यातून कधी पाणी आलेले नमूने अख्या सोळा वर्षाच्या आयुष्यात बघितले नव्हते. मोरीसमोर एक दोरी लावून त्यावर कपडे टांगलेले तेवढाच एक आडोसा. बाकी त्या खोलीत आडोषाला असे काहीच राहीले नव्हते. सगळं काही उघडयावर नाही म्हणायला एक पोटमाळा होता. त्यावर नमू आणि तिची भावंडं दाटीवाटीने झोपत.

मोरीत पडलेल्या खरकटया उष्टया भांडयांचा ढीग मनात असूनही पाण्याअभावी नमूला आणि तिच्या आईला सगळी घाण तषीच टाकून पाण्यासाठी खेपा टाकाव्या लागत. चार पैसे मिळवण्यासाठी आई दिवसभर लोकांकडे काम करी. बिचारीला कधी क्षणभर बसून सुखाचा घासही तोंडात घालायला जमत नसे. नमूचे कोमल मन आईच्या आठवणीने द्रवले. पावलं घुटमळली. वाटलं आईच्या मांडीवर डोकं ठेवून घटकाभरं बसावं. पोटभर खायला मिळावं. आईचा खरखरीत हात गोधडीसारखा अंगभर ओढून घ्यावा.

पुढल्याच क्षणी कोपऱ्यातल्या खाटेवर सदान्कदा विडया फुंकत बसलेल्या फाटक्या शरीराच्या बापाची तिला आठवण झाली आणि ती पचकन जमिनीवर थुंकली. शी! बापाच्या नात्याला काळं फासणारा हा कसला बाप माझा? नुसत्या विचाराने ही

नमूच्या अंगावर शहारा आला. एक वेळ गरिबी परवडली, उपाषी राहणं परवडलं, घरातील ही घाण कषी सहन करावी माणसांन! वाटलं हातातली ओझी टाकून पळूल जावं, कुठंतरी पण कुठं जाणार? कोवळया वयातल्या नमूला कुठं जावं काय करावं काहीच कळत नव्हतं. नमूने हताषपणे मान हलवली. कमरेवरची कळषी वरखाली केली. बापाची नजर आठवून पुन्हा एकदा शहारली.

नमूला कळायला लागले तेव्हा बापाची नजर काही वेगळेच सांगून गेली. मनातून चरकली. प्रत्यक्ष सख्या बाप आपल्याकडे वेगळयाच नजरेने बघतो ह्या जाणीवेनेच ती बिचारी धसकून गेली. खोलीत धड बसायला आणि झोपायलाही जागा नाही. कपडे बदलायलाही जागा नाही. बाप सदान्‌कदा दारुच्या नषेत नाही तर विडीचे झुरके घेत खाटेवर पडलेला. त्याचे तांबारलेले डोळे आपल्याला सतत न्याहाळत असल्याचा नमूला भास होई.

गेले कित्येक दिवस नमूने निर्धास्तपणे मोकळा श्वास घेतला नव्हता. बिचारीची सतत घुसमट होई. ‘‘आई, आपण इथून खूप दूर छान छान घरी जाऊया का ग? माझ्या एवढी पोरं शाळंला जातात छान छान कपडे घालतात. पलीकडच्या गल्लीतल्या सुरुची बघ किती मज्जा आहे. किती झकास कपडे घालते. वडा पाव, केक खाते आणि पायात किती सुंदर चांदीच्या साखळया आहेत तिच्या चमचमणाऱ्या छुम छुम आवाज करणाऱ्या.’’ नमूच्या आनंदाच्या सीमा एवढयाच होत्या लहानपणी पाहिलेल्या स्वप्नात चांदीचे पैजंण खूपदा तिला दिसत असत. आई रागावून तिला गप्प करी. ‘‘अग, झक मारली आणि या म्हाताऱ्याषी दुसरं लग्न केलं मी वाटलं आपलं सगळयांचचं आयुष्य सुधारेल तुझा बा गेला आणि मी एकटी पडले. वाटलं हा नेहमी मदतीला धावायचा, बरा आधार देतोय कसलं काय आपलं नषीबच फुटकं सगळेच मेले लांडगे. दोन वर्षात दोन पोरं झाली आणि दारुने खाल्लं याला. लागला खोकायला टिबीने. औषधपाण्यात सगळे पैसे गेले नोकरी गेली आणि बसला खोटेवर कायमचा.’’ नमूची आई भडाभडा बोलत सुटली आणि नमू आ करुन तिच्याकडे पाहू लागली. आईची तळमळ बाहेर पडत होती आणि नमूची वाढत होती. नमूला कळले आपला बा हा आपला नाहीच आहे.

नमूला या धक्यातून सावरायला खूप दिवस लागले आणि मग तिला बापाच्या प्रत्येक कृतीमागचा अर्थ हळूहळू ध्यानात येऊ लागला जिथे रक्ताचे नातं नाही तिथे प्रेमाच्या ओलाव्याची कषी अपेक्षा करायची? नमूचे विचार आणखीनच प्रौढ झाले नमूची बारीकषी कुडी, काटकुळया कोवळया हातांनी भावंडांची पोटं भरण्यासाठी आईला मदत करु लागली.

दिवस पुढे  सरकले नमूच्या आयुष्यात काळेकुट्ट निराषेने भरलेले दिवस येत होते आणि जात होते. नाही म्हणायला तारुण्य नमूच्या उंबरठयावर येऊन दस्तक देत होते. सडपातळ नमू काळीसावळी असली तरी सुंदर दिसू लागली. तिचे तेल न लागलेले कोरडे केसही कपाळावर पसरुन सुंदर दिसू लागले. बांधा कमनिय वाटू लागला नमूलाही आपल्यातील बदल गल्लीतल्या पोरांच्या नजरेतून जाणवू लागला. तिला पाहून जातायेताना षिट्टया वाजू लागल्या. नमूचे खुलते सौंदर्य पाहून पोरीवर कावळयासारखी नजर ठेवून असलेल्या म्हाताऱ्याचे डोळे चमकले.

एक दिवस नमू थकून सगळी कामं आटपून घरी आली दारातच एक पोरगेला तरुण आईषी बोलत उभा असलेला दिसला. नमूची पावलं रस्त्यात रेंगाळली. हा तरुण कोण आणि आपल्याकडे कषाला आला असेल याचा ती उभी राहून विचार करु लागली आईने तर पायरीवरच बसकण मारली होती. ''आत बरं वाटतं न तुम्हांला?'' नवखा तरुण आईची चौकषी करत होता.
नमूने हे बघितले आणि आईच्या काळजीने ती चटकन पुढे झाली. ''आई, काय झालं तुला?'' आईच्या खांद्याला स्पर्ष करुन ती म्हणाली.

''काही काळजी करण्यासारखं नाही गं नमू गल्लीच्या टोकाषी भजी घेत होते तर मेला एक मोटरसायकलवाला जोरात धक्का देऊन गेला मेल्याचे काय डोळे फुटले की काय कळेना झालं बघ. हे नसते तर मी रस्त्यात चांगलीच आपटलीच असते. आभार मान त्यांचे.'' आई त्या तरुणाकडे बघत बोलली. आत्ता कुठे नमूने त्या तरुणाकडे रोखून बघितले. चांगलाच स्मार्ट दिसत होता. त्याच्याकडे बघता बघता तिला आपल्या अजागळ कपडयांची, अस्ताव्यस्त केसांची जाणीव झाली. आपल्या आईला सावरणाऱ्या तरुणाला आत बोलावून चहा देण्याची सुद्धा नमूची परिस्थिती नव्हती. शरमेने कधी नव्हे ते नमूला हतबल वाटले. त्याचे हळूच आभार मानून ती आत पळाली. तो तरुण नजरेआड होईपर्यंत उगीचच खुडबुड करत राहिली.

थोडया वेळाने रिकामे डबे उलटेपालटे करुन तिने उरलेले मूठभर तांदूळ शोधून काढले आणि सर्वांना पेज करुन वाढली. खाटेवरल्या म्हाताऱ्याकडे दुर्लक्ष करुन आपली पथारी आईजवळच पसरली आणि पुढल्याच क्षणी ती झोपेच्या आधीन झाली.

स्वप्नात ती कुठेतरी दूर दूर चालली होती. आजूबाजूला अनेक खाचखळगे होते. त्यांना चुकवीत चुकवीत अगदी जपून जपून पावलं टाकीत ती चालली होती. दूर कोठेतरी आईला अपघातातून वाचवणारा तरुण शीळ मारत चालला होता. त्याला

असं अचानक समोर पाहून तिला खूप आनंद झाला आणि अचानक त्याने मागे वळून बघितले. त्याच्या नजरेत तिची नजर मिसळली आणि तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्याचे तिच्याकडे बघून मोहक हसू केले आणि झटक्यात खिषात हात घालून एक वस्तू तिच्यासमोर धरली. ती वस्तू बघून स्वप्नातच नमू मोहरली, आनंदाने चिंब भिजली. तिचे आवडते, चमचमते चांदीचे पैंजण त्याचे तिच्या मुठीत कोंबले. ते बघून ती हरखली, धुंदफुंद झाली आणि अचानक बा कुठूनतरी समोर आला आणि ते पैंजण तिच्या हातातून झटका देऊन खेचू लागला. ती घामाघूम होऊन ते पैंजण वाचवण्याचा अटीतटीने प्रयत्न करु लागली, पण..... पण त्याचे ते खेचून त्याचे तुकडे तुकडे केले त्याची नक्षी वेडीवाकडी झाली. ते बघून नमू झोपेतच स्फुंदून स्फुंदून रडू लागली.

''नमू काय झालं, उठून कामाला लाग बये. कामावर न जाऊन कसं चालेल पोरी. आई तिच्या डोक्यावरुन हात फिरवीत बोलली. नमूला आईच्या गळयात पडून रडून घ्यावेसे वाटले. पण तिचे दुःख, तिच्या भावना समजून घ्यायला त्या घुसमटलेल्या खोलीत कुणालाच वेळ नव्हता, तषी परिस्थितीच नव्हती. नमू आवंढा गिळीत मुकाटयाने कामाला लागली. कामावर पोचली तर घरचे रिकामे धान्याचे डबे तिच्या डोळयासमोर आले. मालकिणीकडे झाडता झाडता अनेकदा जमिनीवर पडलेले धान्य गोळा करुन घरी आणावेसे तिच्या मनात येई. तेवढयात दोन चार भाकऱ्या पोटाची खळगी भरायला कामी आल्या असत्या. पोटात भूकेच्या आगीचा डोंब उसळला होता. कालची चमचाभर पेज कधीच पचली होती. शेवटी मनाचा हिय्या करुन तिने मालकिणीकडे पैसे मागितले. सुट्टे पैसे घरात नाहीत म्हणाली नमूला भडभडून आले. अपमानाने, भूकेने कळवळत ती रस्त्याने चालू लागली.

घराजवळच तिला कालचाच तरुण दिसला. त्याने तिला बघून ओळखीचे स्मित केले. नमूची केविलवाणी अवस्था अचूक ओळखली. ''चहा घेणार?'' नमूला निरखित तो बोलला. अनोळख्या तरुणाबरोबर जायला नमूला चमत्कारिक वाटले खरे, पण पोटातील भूक 'हो म्हण हो म्हण' म्हणून हट्ट करुन बसली. हॉटेलात बसल्यावर आणि दोन घोट चहा पोटात गेल्यावर स्वर्ग हाती आल्यासारखे वाटले तिला. त्याचा चेहरा तिला एखाद्या सिनेमातल्या हिरोसारखा वाटला. तिच्या रंग उडालेल्या विटक्या आयुष्यात इंद्रधनुष्याचे रंग भरल्यासारखे वाटले क्षणभर तिला! आणि मग ते इंद्रधनुष्यी रंग तिला अंगभर लेवून घ्यावेसे वाटू लागले. त्या दिवसाची पुनरावृत्ती रोज होऊ लागली. कधी आईस्क्रिम, कधी भेळ तर कधी चक्क बर्फाचा गोळा, कधी चौपाटी तर कधी राणीची बाग, नमूचे हरवलेले बालपण जणू परत आले. तारुण्यही

एका नविन झुल्यावर झुलु लागले. तो झुला झुलवणारा, कोणीतरी प्रेमाने हक्काने जवळ घेणारा तिला रोज रोज भेटू लागला.

‘नमू, ही साडी घे तुला.’’ हिरवीगार, जरीच्या काठाची साडी नमूच्या हातात ठेवत तो म्हणाला. ती सुंदर, तलम, हलकी साडी, स्पर्ष करायलाही किजी मज्जा वाटत होती. पण चक्क साडीची भेट म्हणजे खूपच झाले की, नमूने साडी परत केली. ‘’ नको,आई काय म्हणेल? षिवाय ही. साडी महागही दिसते.’’

‘अगं, तुझ्यापुढे काहीच नाही.’’ तो तिच्या गालावर टिचकी मारत म्हणाला. नमूच्या अंगावर गोड काटा आला. ‘’पण आईला काय सांगू?’’ काही नाही. ‘’सांग मालकिणीने दिली म्हणून.’’ ‘’अय्या, मला हे आधीच कसं सुचलं नाही?’’ भाबडया नमूने बोलून दाखवले. मग या नव्या मालकिणीकडून कधी चप्पल, कधी पर्स, तर कधी नव्या बांगडया. नमूच्या शरीरावर झळकू लागल्या. ‘’नमू, तुझी नवी मालकीण मोठया मनाची दिसते गं.’’ आई नवलाने लेकीच्या चेहऱ्यावरची खुषी न्याहाळीत बोलली.

‘’मग, आहेच मुळी आणि प्रेमळ तर इतकी की मला काही कमी पडू देत नाही.’’ आईला वाटलं, पोरीला जरा चार सुखाचे घास मिळतात, बापापासून दूर जेव्हढी राहील तेवढी बरी. नाहीतरी काय पोरीला सुख मिळतयं या घरात. या उदार मालकीणीकडे आपल्या दुसऱ्या पोरांनाही कामावर पाठवण्याचे स्वप्न नमूची आई बघू लागली. इकडे नमू आणि तिची मालकीण (!) यांचे अगदी सूत जमून त्याची दोरीच बनू लागली होती आणि त्या दोरीचा फास बनून नमूच्या गळयाभोवती अगदी घट्ट बसू लागला होता, आजाण भोळी नमू प्रेमात पडून अगदी गटांगळया खात होती.

आणि एक दिवस ....‘’नमू , चल आपण लग्न करुया’’ तो तिचा हात घट्ट धरत म्हणाला. त्या अनपेक्षित वाक्याने नमू हरपून गेली पण दुसऱ्याच क्षणीधसकूनही गेली. ‘’आई काय म्हणेल? बा नाही मला परवानगी देणार.’’ एवढे दिवस आईला अंधारात ठेवल्याबद्दल नमूला पष्चताप होऊ लागला. पण सगळं कसं मोरपिस अंगावरनं फिरल्यासारखं घडले आणि ती लोण्यासारखी विरघळत गेली त्याच्यापुढे ‘’पळून जाऊ या’’ ‘’काय?’’ नमू भानावर येत ओरडली आजुबाजुचे लोक थांबून वळून तिच्याकडे बघू लागले. ‘’नाही, मला नाही पटत काय करीच काय सांगतो तू?’’ ‘’अग, एवढं काय झालं घाबरायला? माझ्यावर प्रेम आहे ना तुझं? मग एवढं पण ऐकणार नाहीस का माझं? ‘’लग्नच करायला सांगतो ना तुला. राणीसारखी ठेवीन. नवी साडी, बांगडया, हार सगळी तयारी करतो, तू फक्त हो म्हण.’’

''आणि चांदीचे पैंजण?'' नमू भोळसटपणे नकळत त्याच्या डोळयात हरवून जात म्हणाली.

तिच्या डोळयासमोर मेंदी भरल्या हातांची, हिरवा शालू नेसलेली, बांगडया ल्यायलेली सजलेली स्वतःची मूर्ती दिसू लागली. नमूला आपला दुसरा जन्मच झाल्याचा भास झाला. पायातल्या पैंजणांषी चाळा करीत आपल्या प्रिय व्यक्तीची वाट पाहत असलेली नमू, दारिद्रयात पिचलेल्या, सावत्र बापाच्या जाचाला कंटाळलेल्या नमूला हुसकून लावू लागली. अंधाऱ्या वाटेवरुन ठेचकाळून धडपडून नमू आता कंटाळली होती कोणीती तिला आता प्रकाषाकडे नेण्यासाठी हात पुढे करीत होते नमूला अचानक सुटकेचा मार्ग समोर आलेला दिसला.

दोन दिवसांनी नमूने थोडेसे कपडे एका छोटया पिषवीत भरले आणि ती नेहमीप्रमाणे कामावर निघाली. दारात तिची पावलं रेंगाळली. पटकन वळून तिने आईला वाकून नमस्कार केला. ''काय गं बाई आज अवचित?'' आईकडे बघताना तिचे डोळे पाणावले भावंडांच्या आठवणीने काळजात खुपले पण दुखणाऱ्या काळजाला समजावत मनाषी एक निर्धार करत तिने पाऊल घराबाहेर टाकले कधीही परत न येण्यासाठी. मग मागे वळूनही न बघता ती झपझप चालू लागली एका नव्या आयुष्याची सुरुवात करण्यासाठी!

.....संध्याकाळ दाटून आली होती. हिरवीगार साडी अंगावर लेवून आणि हिरव्याकंच बांगडया हातभर भरुन नमू 'त्याच्या' खोलीत स्वप्नरंजन करीत पलंगावर बसली होती. आज तिच्या आयुष्यातला सगळयात आनंदाचा दिवस होता. आता कोणत्याही क्षणी 'तो' येईल आणि हात पुढे करुन तिला मिठीत घेईल मग अलगद पणे गुलाबी कागदात बांधलेले चमकदार सुंदर कुपऱ्या कुपऱ्यांचे चांदीचे पैंजण तिच्या पायात घालील. तिनेच तर त्याच्याकडून पैजण आणण्याचे कबूल केले होते. आज तिचे अनेक वर्षाचे स्वप्न पुर्ण होणार होते. लहानपणापासून दूरवर सोनेरी चंदेरी चमकणारे पैंजण बघून ती तासनतास टक लावीत उभी राही. पण आज तिचे मन पैंजण पायात घालायला मिळणार म्हणून आनंदाच्या कारंज्यावर थुईथुई नाचत होते. जाणाऱ्या प्रत्येक क्षणाबरोबर दाराकडे उत्कंठतेने बघत होते.
..... आणि तो? तो निघाला होता गालातल्या गालात हसत, खोलीला कडी कुलूप लावून नमूला कायमचे अडकवून, नवीन गिऱ्याईकाला गाठण्यासाठी तो ही आज खूप खूप आनंदात होता. त्याचेही मन आनंदाने थुईथुई नाचत होते. येणाऱ्या नवीन गिऱ्याईकाकडून मिळणारी पैषाची गड्डी त्याला आतापासून खुणावत होती. कारण हे

तर त्याचे रोजचेच काम होते. थोडेसे गोड बोलून भोळया, अडाणी, दरिद्री मुलींना फसवून गिऱ्याईकांच्या बाजारात आणून बसवण्याचे. नमूच्या बापासारखे अनेक बाप आपली लालसा भागवण्यासाठी आपल्या पोरीबाळींना विकल्यासाठी त्याच्यापुढे गुढगे टेकीत असत. नाहीतर थोडीच नमूसारखी पोर गळयाला लागली असती. अर्थात त्याने त्यासाठी म्हाताऱ्याला योग्य ती किंमत दिलीच होतीच. म्हाताऱ्यानेच तर नमूची इत्थंभूत माहिती त्याला दिली होती. नमूची आई कुठे जाते कधी परत येते अगदी खडानखडा माहिती त्याला पुरवली होती. मग काय, मोटरसायकलवरुन मिळायला काहीच कठीण नव्हते. पुढचे सगळे नाटक त्याच्या मनासारखे घडत गेले. आज तो जाम खुष होात स्वतःवर चांदीचे पैंजण म्हणे? तो स्वतःषीच खुनषीपणे हसला. आता बघ कषी जन्मभराच्या बेडया टाकतो पायात ते कुठे जाषील सुटून त्या बेडयांतून अग अषा कितीतरी मुली या बेडयात अडकल्या आहेत. सगळया एकजात मूर्ख थोडसं हसलं, जराषी सहानुभूती दाखवली की पाघळल्याच साल्या. पैंजण काय, आता घुंगरुच घालतो तुझ्या पायात. मग बघ कषी नाचषील माझ्या तालावर छुम छुम छुम छुम.

विचारांच्या नादात तो कधीच गिऱ्याईकाच्या घराषी पोचला. आणि पुन्हा एकदा स्वतःवरच खुष होत शीळ घालू लागला.

❤❤❤

# ४ पन्नाशी ओलांडताना

संध्याकाळ दाटून आली आहे. समोर रस्त्यावर वाढत जाणाऱ्या माणांच्या आणि वाहनांच्या गर्दी मी संथपणे बघते आहे रोजचा हा माझा छंदच म्हणाना परंतु आज मी तुम्हांला एक विचित्र घडलेली गोष्ट सांगणार आहे नाही, मी तुम्हांला दुःखी करणारी किंवा बुचकळयांत टाकणारी अषी कोणतीच कथा सांगणार नाही किंवा ही कथा, कहाणी ऐकून तुम्ही पोट धरुन हसू लागणार आहात की गडबडा लोळणार अषीही मी खात्री देत नाही. कारण गोष्टच तषी विपरीत घडली आहे. कोणाच्या इतरांच्या बाबतीत नसून ती खुद्द माझ्याच बाबतीत घडली आहे. आता मला एक सांगा, पन्नाषी ओलांडताना माणसाला काय काय होऊ शकते? चष्मा लागू शकतो, एखादा दात पडू शकतो, केस आणखीनच पांढरे होऊ लागतात. (जास्ती डाय करायला लागतात) किंवा टकलावरचे केस किती प्रयत्न केला तरी आणखीनच विरळ विरळ होतात. आणखी काय घडू शकते? पायाना फॅक्चर होऊ शकते? मानेला ट्रॅक्षन लावायची वेळ येते. म्हणजे होते काय तर एखादी सुंदर तरुणी आपल्याकडे बघत नाही माहित असूनही मानेला दुखापत करुन घेतात. नाचता येत नसले, तरी एखाद्या तरुणीने किंवा तरुणाने आग्रह केला म्हणून नाच (!) केला जातो आणि मग वाढलेल्या पोटाचा आणि कंबरेचा भार सांभाळताना पायावर अतोनात ताण येऊन फ्रॅक्चर होऊ शकते. बघा विचार करुन सांगा आणखी काय घडू शकते? नवऱ्याचे लक्ष आपल्याकडे जावे म्हणून पार्लरमध्ये हजारो रुपये खर्च घडू शकतो आणि एवढे करुनही नवरा कॉम्प्युटरच्या स्क्रीनवरनं एकदाही नजर वर न उचलता थंडपणे आपले काम पुढे चालू ठेवतो. तेव्हा कदाचित कायमची डोकेदुखी किंवा अर्धषिषीचा आजार सुरु होऊ शकतो. दुदैवाने म्हणा किंवा सुदैवाने म्हणा यापैकी एकही प्रसंग माझ्या बाबतीत घडला आहे. हरलात नं विचार करुन. वाटलचं होतं मला तसं अहो अजूनही माझाही विष्वास बसत नाही या गोष्टीवर त्याचं असं झालं, पाचसहा दिवसापूर्वी सकाळी जाग आली आणि उठायला गेले ते एमदम गरगरायलाच झालं मी धसकले व्हटिगो का काय म्हणताय ते तर नाही ना झालं बिछान्यात सावकाष उठून बसले तर बाजुच्या घरातून एकदम फोडणीचा वास आला आणि मला एकदम मळमळायला लागलं की उलटी येणार की काय असं वाटलं पटकन पटकन कषीबषी उठून बाथरुममध्ये गेले तर कोरडया उलटया यायला लागल्या की चक्क. आता मात्र मी घाबरले. हे काय आता भलतंच!

पंचवीस वर्षापूर्वीचे दिवस आठवले. इयान आणि इला दोघांच्याही खेपेला अगदी अस्सचं होत होतं. मळमळत होतं. उलटीसारखी भावना व्हायची. जरा फोडणीचा वास आला की उलटया व्हायच्या सुरुवातीला! अगदी बेजार झाले होते पंचवीस वर्षापूर्वीची. केवळ गोष्ट होती म्हणा. अहो कित्येक वर्षे (म्हणजे लग्नाच्या आधी हो) मला वाटायचं नवराबायकोनी एकमेकांना हार घातले की बाळ होतं. नंतर नंतर वाटायचं गाणी म्हणत एकमेकांना ''मै तुझसे प्यार करता हूँ'' म्हणत नवरा बायको झोपले की बाळ होतं. सगळ पिक्चरचा परिणाम हो. आमच्यावेळी कुठे सगळं उघडउघड दाखवलं जायचं? आता शेजारचा ढोपराएवढा पिंटू पण बेधडक सांगतो. ''आमच्याकडे मी एकुलता एकच आहे ओन्ली चाईल्ड. मम्मी पप्पांनी फॅमिली प्लॅनिंग केलं ना?'' मलाच ते ऐकून लाजल्यासारखं झालं. कालाय तस्मै नमः दुसरं काय हं तर काय सांगत होते लग्नाआधी कसलं हो फॅमिली प्लॅनिंग नं कसलं काय? (लग्नानंतरही हयांनीच सगळं सांभाळले बरं का!) मी या बाबतीत अगदीच भोळी. (बावळट ला जरा चांगला शब्द सुचला) तर लग्न झाल्यावर दोन महिन्यात असं व्हायला लागले. म्हणून मी थोडी घाबरुन गेले. पोटात पाणी ठरंना. डॉक्टरांकडे गेले आणि त्यांनी ही गोड बातमी सांगितली तेव्हा अषी लाजले ना. तेव्हा सोनोग्राफी वगैरे फॅड नव्हतं. डॉक्टरांनी सांगितलं आता सगळी कामं करा आणि दोन तीन महिन्यांनी दाखवत चला.'' खरंच, बेडरेस्ट, सिझेरिअन हे शब्द आमच्या डिक्षनरीत (किंवा डॉक्टरांच्या डिक्षनरीत) नसावेत त्या काळी. मग काय अगदी शेवटपर्यत कामे करीत होते दोन्ही वेळी. अगदी बाळ होईपर्यत. दोन्ही मुलं पण कषी सुदृढ झाली. अगदी सगळयांनी टकमक बघावी अषीच. आता इला होईल चोवीस वर्षाची आणि इयान होईल बावीसचा. दोघांची षिक्षणही अगदी सुरळीत पार पडली. अजूनह इयानला षिवायचं आहे म्हणा आणि इला तरी गधडी कुठे षिक्षण पुरे म्हणते. दोघांना खूप षिकायचं आहे. मी बोललेही त्यांना, ''इलाला म्हणावं आता नोकरी बघून स्थित व्हायला सांगा ना. म्हणजे लग्नाचं बघायला बरं.'' ''अगं, षिकू दे तिला मनासारखं मग आहेच संसार मागे.'' यापुढे मी काय म्हणणार बापडी.

बघा, आता बोलता बोलता कुठून कुठे पोचलो. पुन्हा एकदा खमंगसा वास नाकातून पोटात षिरलाय आणि केली ती उलटी पुन्हा होणार असं वाटू लागलयं. आता कषी सांगू सगळयांना ही बातमी! हयांना फोन लावते. ''अहो ऐकलं का! एक बातमी सांगायची तुम्हांला''
''हं बोल लवकर. कामात आहे गं, सांगून टाक बरं पटकन.''

''तसं नाही, इष्षं आता कसं सागू फोनवर तुम्हांला.''

''अगं, काय झाले तरी काय? शेजारणीचा प्लाझमा टीव्ही बंद पडला का? नाही, मग 403 मधला ड्रायव्हर आणि 203 मधली मोलकरीण पळून गेली का? हे पण नाही, मग काय, इलाला बॉयफ्रेंड भेटला का? बरं झालं चल. सुटलो एकदाचे.'' ''अहो तसं काहीच नाही.''

''असं नाही, तसं नाही मग माझं डोकं खाऊ नकोस आता.'' असं म्हणून त्यांनी पटकन फोन आपटला. छे! सगळं कठीणच होऊन बसंलय बाई आता. हे तर सतत माझ्यावर असेच ओरडत असतात. परवा शॉपिंगला गेले आणि घासघीस करुन चांगली वीस हजाराची साडी सतरा हजाराला घेऊन आले, तरी केवढे चिडले माझ्यावर. मला म्हणाले, आता हया वर्षी आठवडया आठवडयाला साडी घेणे बंद. केवढं रडू आलं हो मला ते कठोर बोल ऐकून. बायकांचा मेला जन्मच असा असतो हो. पुरुषांनी मजा करुन घ्यायची आणि बायकांनी त्याचे परिणाम भोगायचे. हा विचार करताना माझ्या पोटावरुन मी हात फिरवून बघते. इयान, इलाला सांगावी का ही बातमी. धीर करुन इलाला हाक मारते. नाहीतरी हल्ली तिला मी जरा हाक मारली की डिस्टर्ब व्हायला होतं. सतत कानाने ते इयरफोन्स आणि तिच्या रुमचा दरवाजा बंद. मेले आमच्यावेळेस सगळे खाली गाद्या घालून एका लायनीत झोपायचो. एकाच तंगडं दुसऱ्याच्या गळयात तर दुसऱ्याचा हात तिसऱ्याच्या पायात सॉरी कंबरेत. कसली स्वतंत्र बेडरुम आणि कसलं काय? बाबांनी जरा आवाज चढवला की थरथरायला व्हायचा आणि ही कार्टी अगदी डॅडीच्या गळयात हात घालून बसते. अरे तुरे करते. ''इला अग इला जरा येतेस का गं इकडे?''

''येस मॉम. काय झालं, लवकर सांगून टाक.'' (अरे हे काय लवकर सांगून टाक, सगळयांना एवढी कसली घाई लागून राहीले? अजून नऊ महिने थांबा म्हणावं!) '' म्हणजे काय आहे नं इला. सकाळी उठले तर एकदम गरगरतयं गं गेले चार दिवस. ''

''हं, अपचन असणार. तरी मम्मा तुला सांगत असते थोडं कमी खा म्हणून. माझी डायेटिषीयन वर्षा आहे नं तिची एकदा अपॉईमेंट घे. बरं मी जाऊ?'' ''अगं, इला म्हणजे तसलं काहीच नाही. हे जरा वेगळे आहे.'' ''वेगळं आहे? मग दुसऱ्या डायटिषीनची अपॉईमेंट घेऊ का?'' ''इला, तू या घरची मोठी मुलगी. आता जरा जबाबदारी घ्यायला शीक.'' का मम्मा तू आहेस नं जबाबदारी घ्यायला.'' ''तसं नाही गं लवकर या घरात एक पाहुणा येणार आहेत्र'' 'नो, नो. ममी पाहुणा वगैरे अजिबात नको. अगं पुढच्या महिन्यात माझं इव्हेंट आहे. मी माझे सगळे मित्रमैत्रीणी येणार, जाणार त्यांना तर एक खोली लागेलच नं. षिवाय कधी अधेमध्ये पार्टी झाली तर त्या

तुझ्या पाहुण्याला कुठे ठेवणार? किती एम्बॅरॅसींग होईल ग. बरं मी जाते आता बाय.'' कपाळावर हात मारला. हया मुलीलाा आईच्या बाळंतपणाची कसली म्हणून फिकीर नाही. पन्नास वर्षापूर्वी आईची बाळंतपणं मुली करायच्या. आईचं हवं नको बघायच्या. लहान भावंडांना सांभाळायच्या. कसा हो जमाना बदलला. आता हयांना एकटंच रहायला हवं. तषा मित्रमैत्रीणी हव्यात पण पार्टीपुरत्या धमाल करण्यापुरत्या. पाहुण्यापुढे यांना म्हणे ऍक्बारॅसींग म्हणजे चक्क लाज वाटते पाहुण्याची. देवा, मग लहान मुलं कसली सांभाळतात हल्लीच्या या पोरी. कदाचित शहरी जीवनामुळे आम्हीच हयांना फार लाडाकोडात वाढवले हयाचाच तर हा परिणाम नसेल? कदाचित खेडया पाडयात परिस्थिती वेगळी असेल.

हा विचार करुन गावातल्या (सोनपूर) माझ्या चुलत बहिणीला मी फोन लावला. ती तरी माझ्या काळजीने धावत येईल या विचाराने. ''सोने, अग तुझी खुप आठवण आली बघं आज.'' ''का गं अक्के! तू काय टीव्ही वर सिरीयल वगैरे बघत नाहीस का यावेळी?'' ''नाही गं बाई, काय सांगू तुला, अगं तुझ्या अक्केची तिसऱ्या खेपेची तयारी कर बाई आता.''

''ऑ, आत्ता गं बया. काय डोकं बिकं फिरलं की काय अक्के तुझं या वयात. अन् भाऊजींना पण काय कळेना झालं की काय? आता मला तरी कुठं वेळ आहे? या टीव्ही सिरियल्स बघण्यात अषी बिझी असते अषी बिझी असते की विचारु नको. आता सरकार हम दो हमारे दो' म्हणून सांगायची थांबली म्हणून आपण पण विचार करायचा थांबायचं की काय? अगं, हा अविचार करुन बसलीस?'' आणि तिनं माझ्यावर असं तोंडसुख घेतलं की मला त्या सुखानच पुन्हा चक्कर आली. माझा इयान मला सांभाळायला धावला म्हणून बरं. नाही तर हया अवस्थेत खालीच पडले असते ना!

''अगं, मम्मा जरा सांभाळून रहा स्वतःला कोणाषी बोलत होतीस फोनवर?'' ''तुझ्या सोनूमावषीला जरा इकडे बोलवणार होते थोडया दिवसांसाठी'' ''सोनूमावषी? इकडे? नको मम्मा, नको. अजिबात नको. अगं, माझ्या परिक्षा असतात षिवाय इकडे थोडया दिवसांसाठी म्हणजे पुन्हा खोलीचा प्राब्लेम. ममा, माझी रुम मी बिल्कुल शेअर करणार नाही हे कुणाबरोबर ही. सॉरी पण मम्मा प्लीज समजून घे हं!''

माझ्या पडलेल्या चेहऱ्याकडे बघून इयान सॉरी म्हणाला, 'खरा पण मनातून मी समजले की हल्लीच्या पिढीला स्वतःची कोणतीच गोष्ट दुसऱ्याबरोबर शेअर करायची नाही. आता हया पोरांना प्रत्येक गोष्ट चार भिंतींच्या आत, बंद दाराआड करायला

आवडते. भाऊबहिण, आईवडिल प्रत्येकाची स्वतंत्र रुम, स्वतंत्र फोन, स्वतंत्र टीव्ही. हयातर निर्जिव वस्तू झाल्या. पण मनं झोंबणे, माणूसकी दाखवणे, जवळीक साधणे हया गोष्टी तर सजीव माणसाच्या अस्तित्वाची साक्ष देतात ना. मग हया पिढीला कोणत्याच बाबतीत जवळीक साधता येणार नसेल किंवा साधायचीच नसेल तर पुढे वीस बावीस वर्षानी काय होईल या समाजाचे? प्रत्येक जण फक्त हातातील यंत्राची बटणे दाबीत यंत्रवत जीवन जगत असेल. बापरे हया विचाराने मी एकदम दचकले. नकळत पोटावर हात ठेवला. हया जीवाने काय होईल? वीस वर्षानंतर? आपल्या दोघांपैकी कोणी असेल नसेल तोपर्यत. ही दोन्ही मुलं आपापल्या संसारात, जगण्यात हरवलेली असतील. हया पोराला कोण आधार देईल तेव्हा. हया विचारांच्या तंद्रीतून मला आमच्या डोअरबेलने जागे केले.

''काय गं, काय झालंय तुला? बरं वाटत नाही का? आणि फोनवर काय सांगणार होतीस सकाळी?'' हे विचारत होते. मी त्यांना प्रथम फ्रिजमधले पाणी देऊन थंड केले. नंतरच माझी शंका हयांना बोलून दाखवली. हे ऐकून हयांचा चेहरा तर पहाड डोक्यावर कोसळल्यासारखा झाला मग पूर्वीची आठवण इलाच्या वेळी मला हयांनी डोक्यावर घ्यायचेच बाकी ठेवले होते. किती आनंद झाला होता त्यांना ते 'बाप' होणार हे ऐकून. पंचवीस वर्षानंतर त्याच बातमीने हयांना भूत पाहिल्यासारख्या यातना दिल्या होत्या. ते कितीतरी वेळ सोफ्यावर धक्का बसल्यासारखे बसून राहीले. जणू काही त्या बातमीने किंवा नुसत्या शंकेने हयांची शक्तीच कोणी हिरावून घेतली होती. ''अगं, पण हे खरं आहे का? असं कसं होईल या वयात? उद्याच डॉक्टरांकडे जाऊन खात्री करुन घेऊन या.'' हे एकेक शब्द हळूहळू उच्चारत बोलले. रात्री जेवण अगदी शांततेत पार पडलं. इयान, इला कोठे मित्रांबरोबर बाहेर पार्टीला गेले होते. मी आणि हे दोघेच टेबलाजवळ बसून होतो. मी हळूच त्यांच्या चेहऱ्याकडे बघत होते. हयांना बसलेला धक्का अजूनही ओसरलेला दिसत नव्हता. कसेबसे दोन घास पोटात ढकलून हे झोपायला निघून गेले. मी अवाक होऊन कितीतरी वेळ तषीच बसून होते. काळाबरोबर माणसे बदलतात. हयांनी माझ्याषी काही बोलावे अषी माझी अपेक्षा होती. जषी काही चूक माझ्या एकटीकडून घडली होती. असे हयांचे वागणे बदलले होते. त्या रात्री मला बराच वेळ झोप लागली नाही.

सकाळी उठले तर थोडया वेळाने पुन्हा गरगरायला सुरुवात झाली हळूच उठून बाथरुममध्ये जाऊन फ्रेष झाले. बाहेर आले तर, हे तयार होऊन माझीच वाट बघत होते. ''चल लवकर, तयार हो. डॉक्टर रांगणेकरांची अपॉईटमेंट घेतली आहे. आज सगळया मिटींग्ज रद्द केल्यात मी. हया गोष्टीचा एकदा सोक्षमोक्ष लावलेला बरा!'' हे एखादी गोष्ट लवकर हातावेगळी करुन टाकल्यासारखे बोलत होते. मी मान

डोलावली. पटकन तयार झाले आणि लिफ्टमधून बाहेर पडताना मिसेस खवचट भेटल्याच. हया बाईला एक लिफ्टमधून आत येणे आणि जाणे हयाषिवाय काही दुसरे काही करताना मी बघितले नव्हते. ''अय्या, एवढया सकाळी दोघे कोठे निघालात? काही खास बातमी!'' ''हो, आहे मी तिसऱ्यांदा आई होण्याच्या मार्गावर आहे'' मला जोरात ओरडून सांगावेसे वाटले. पण छे, तोंडातून एक शब्दही फुटला नाही.''

डॉक्टर रांगणेकरांडे एवढया सकाळीच बरीच गर्दी होती. आम्ही दोघे डॉक्टर कधी बोलावतात याची वाट बघत बसलो होतो. तेवढयात कॉलनीत राहणारे आणि हयांच्या ऑफिसमधले मि. रेगे तिकडे उपटले. आता हे आणखी कषाला भेटले इथे मी हळूच पुटपुटले. ''अहो, मिस्टर आणि मिसेस अवचट. दोघेही इकडे जोडीने दवाखान्यात. वहिनी नक्की कोणाला बरं नाही सांगा पाहू?'' हे तर अगदी क्विझटाईम असल्यासारखा कोडी विचारण्याचा आव आणत होते. '' नाही हो, विषेष काही नाही. हिला जरा उलटयांचा त्रास होत होता म्हणून आपलं दाखवायला आणलं.'' ''आहो, उलटयांचा त्रास आणि वहिनींना. इंटरेस्टींग हं.'' आणि स्वतःच्याच भाष्यावर विनोद केल्यासारखे ते खो खो हसत सुटले. एव्हाना बाकीच्या सगळया पेषंटना आम्ही इथे कषासाठी आलो आहोत ते कळून चुकले होते. कारण मि. रेग्यांचा आवाज इतका खणखणीत होता की दोन बिल्डींगपलीकडे उभे राहून ते बोलत असले तरी आम्हांला ते स्पष्ट ऐकू येत असे. ''अहो, पित्त वाढले असेल. आवळा खा दररोज.'' कुणाचा तरी अनाहून सल्ला. (नषिब चिंचा खायला सांगितल्या नाहीत)
''काय आहे नं या वयात असं व्हायचंच. सूर्यनमस्कार घालायला लागा. आत्ता बऱ्या व्हाल.'' (सूर्यनमस्कारांचा आणि उलटयांचा संबंध अजूनही मला समजला नाही.) लोकांची जणू सल्ले देण्याची स्पर्धाच सुरु झाली. तेवढयात डॉक्टरांचे बोलावणे आले. मी आयुष्यात प्रथमच अगदी नर्व्हस झाले. ''बसा. बसा. केव्हापासून असं होतंय?'' पिरीअड कधी आला होता? (अगदी मूलभूत प्रष्न अनेक प्रष्न विचारुन मला डॉक्टरांनी काही टेस्टस् करायला सांगितल्या. ''सध्या, मी काहीच निर्णय घेऊ शकत नाही. आपण या टेस्टसचे रिझल्ट येईपर्यत थांबूया'' बापरे, म्हणजे आणखाी काही दिवस वाट बघणे ओघाने आले.

वाटेत रगडापॅटीस, पाणीपुरी हादडली म्हटलं पुढचं पुढे आता पोटभर खाऊन घेऊ या. रात्रभर झोप अषी काय लागलीच नाही. डोळयापुढे छोटी छोटी बाळं, फेरे धरीत होती. इयान आणि इला भांडीत होती. हे माझ्यावर रागावून बघत होते आणि सोसायटीवाले माझ्याकडे बघून फिदीफिदी हसत होते. सकाळी दचकून उठले तर पोटात एक विचित्रषी कळ आली. एकदम कसली तरी शंका आली म्हणून बाथरुममध्ये जाऊन खात्री केली तर ऋतु चक्र व्यवस्थित आपले काम बजावून गेले

होते. माझ्या भास आभासांचा शेवट झाला. मी एक निःष्वास सोडला! आनंदाचा, दुःखाचा की आणखी कसला माझे मलाच कळलं नाही. तर अषी ही माझी पन्नाषी ओलांडताना घडलेली विचीत्र कहाणी! तुम्हांला कषी वाटली ते जरुर कळवाल ना?

❤❤❤

# ५ तो मी नव्हेच

तो मी नव्हेच

सकाळी मस्त कडक उन अंगावर आले आणि माझी झोप चाळवली. खरं तर सदू रोज माझे आवडे मरुन रंगाचे मखमली पडदे ओढून घेऊन एसी चालू करुन जातो. माझा नाईट ड्रेस, स्लिपर्स सगळा जामनिमा मला तयार लागतो. त्याच्यात जराही चूक झालेली मला खपत नाही. सकाळी मी हाक मारेपर्यत माझ्या खोलीकडे फिरकायचे नाही अषी सक्त ताकीद असते सगळया नोकरांना. आज कधी नाही ते माझ्या नियमांचे उल्लंघन झाले आहे. कुणीतरी पडदे उघडे टाकले आहेत.

आता झोप मोडलीच आहे तर माझी ओळख करुन देतो. मी 'नचिकेत धर्माधिकारी' वय वर्षे पंचवीस. उंची सहा फूट. रंग गोरा. माझ्या उंच, दणकट शरीरयष्टीचा समोरील माणसावर नक्कीच प्रभाव पडतो. माझ्या नजरेतील आणि आवाजाती धार माझ्याषी बोलणाऱ्या व्यक्तीचा गोंधळ उडवते. त्या व्यक्तिला आणखी घाबरवून सोडणे हा माझा छंद. कुणाची उडालेली भंबेरी पाहून मला मनात उकळया फुटतात. माझ्या लहरी स्वभावाला सगळे घाबरतात. 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए' हया कुणीतरी केलेल्या म्हणीचा अनुभव मी नेहमी घेत असतो.

अर्थात हे सगळे मी डॅडीकडून षिकलो, लहानपणापासून बघत आलो. माझे डॅडी 'प्रद्युम्य धर्माधिकारी' हया शहरातील सर्वात मोठे उद्योगपती. काही मोजक्याच प्रतिष्ठीत लोकांमध्ये त्यांची गणना होते. डॅडी या शहरात फक्त दहा रुपये घेऊन आले. पणण आपल्या हुषारीवर, मेहनतीवर आणि स्वकर्तुत्वावर त्यांनी दहा रुपयांचे दहा कोटी केले. त्यांना साथ केली माझ्या मम्मीने आणि नषिबाने मम्मीच्या मते मी तोंडात चांदीचा, नव्हे सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलो. आज मितीला आमचे पाच–सहा बंगले, फार्महाऊसेस, शेती,जमिनी आणि चार कारखाने उभे आहेत. डॅडीचा महत्वाकांक्षी, करारी आणि जिद्दी स्वभाव हुबेहूब माझ्यात उतरला आहे. माझे दिसणेही त्यांच्यासारखेच. माझे चालणे, दिसणेही फार काय तर सवयीही डॅडीसारख्याच आण्णि मा नसणार? लहानपणापासून माझ्या हृदयात डोळयात

डॅडीचीच छबी आहे. माझ्या अंगात त्यांचेच रक्त खेळत आहे. माझी मम्मी तषी साधी सोज्ज्वळ.

तिला आमचे बाप–लेकांचे वागणे फारसे पसंत नाही. बोलत काही नाही पण तिच्या सुंदर चेहऱ्यावर एक बारीकषी आठी उमटली दिसते. विषेषतः मी जेव्हा सदूला, आमच्या नोकरांना वाट्टेल तसे हुकूम सोडतो तेव्हा, बूट, कोट आल्याआल्या भिरकावून देतो तेव्हा, कार भन्नाट चालवतो तेव्हा, माझ्या शेकडो मैत्रिणींना फोन करीत राहतो, पाटर्या देतो तेव्हा तिची ती सुप्रसिद्ध आठी आणखी गडद होते. मम्मा मला नेहमी सांगते. अर्थात मी तिच्या समोर उभा असतो तेव्हाच. (अषी वेळ फारच कमी वेळा येते). ''नचि बेटा, जरा जपून वाग. ।सूंले ।ममच लवनत मिमज वद जीम हतवनदकण आपले सगळे वैभव, पैसा गाडी, बंगले देवाच्या कृपेने मिळालेली देणगी आहे. या सगळयाचा कधी अपमान करु नकोस. नकळत कुणाला दुखवू नकोस. शेवटी माणुसकी हीच जगात श्रेष्ठ ठरते. तुझे रुप, तुझी प्रतिष्ठा, पैसा उद्या कुठल्याही क्षणी नाहीसा होईल पण तू दाखवलेली माणुसकी, लोकांमध्ये वाटलेले प्रेम तिळभरही नष्ट होणार नाही. लोकांच्या दुर्बलतेची चेष्टा करु नकोस. तुला मिळालेल्या सगळया चांगल्या गोष्टींचा लोकांच्या कल्याणासाठी वापर कर तरच तुझ्या मम्माला समाधान मिळेल. ''बापरे बाप! तसे मम्माने सांगितले मला. पटते, पण तेव्हढया पुरते, अरे, मी माझ्या लाडक्या डॅडीचा एकुलता एक मुलगा आहे ना!
कदाचित डॅडीचा स्वभाव जास्त डॉमिनेटींग असल्यामुळे म्हणा किंवा काही कारणाने माझा उद्‌दामपणा, स्वभावाती तिरकसपणा वाढत चालला आहे हे मात्र अगदी खरे! आज शुक्रवार आहे. रात्री मी सगळया मित्र–मैत्रीणींना आमच्या 'विलास' बंगल्यावर पार्टी देणार आहे. शाळा कॉलेजपासून माझी पार्टी– ती पण 'विकएंडची'' कधी चुकली नाही. माझी पार्टी म्हणजे नॉनव्हेजची चंगळ, पेयांची रेलचेल. मस्त संगीत मनाला मदहोष करणारी मंदधुंद करणारी विकएंड पार्टी त्यामुळे मी 'नचिकेत धर्माधिकारी' बोलावणार पार्टीला म्हटल्यावर सगळया पोरीटोरी माझ्यावर इंप्रेषन मारायला एका पायावर तयार. आज ऑफिसमधल्या पोरींना बोलवीन म्हणतो. येतील सगळया पुढे पुढे करत! ओहो! चुकलो सगळया नाही. ती समिक्षा नाही येणार सहजासहजी. हे प्रकरण जरा वेगळेच आहे. सरळ तरतरीत नाकावर सदानकदा राग असतो तिच्या. येते जाते पण कधी स्वतःच्यात तोऱ्यात. बोलतेही धारदार आवाजात, डोळयाला डोळा भिडवून. समजते कोण स्वतःला ही. अरे, या नचिकेतला घाबरत नाही असा प्राणी जन्माला यायला आहे या पृथ्वीवर.

काय पण योगायोग बघा. माझी मॅनेजमेंट डिग्री पूर्ण करुन डॅडीचे जे कॉम्प्युटर युनिट मी चालू केले आहे तिथेच ही बया कॉम्प्युटर प्रोग्रॅमर आहे. पण तोरा मात्र

डायरेक्टरलाही लाजवील असा आहे. विचारांच्या तंद्रीत मी माझ्या केबिनजवळ कधी पोचलो कळलेच नाही. लिलीला माझ्या सेक्रेटरीला पार्टीविषयी सूचना देऊन माझ्या केबिनमध्ये षिरलो.

संध्याकाळी सगळया फाईल्स ड्रॉवर मध्ये टाकून कॉम्प्युटर लॉग आऊट करत असतानाच दारावर टकटक झाली. माझी गुबगुबीत चेअर गर्रकन वळवून ''यस, कम इन'', म्हणतानाच दार उघडले गेले आणि समिक्षा विजेसारखी आत आली. तिचा गोरा गुलाबी चेहरा आणखीनच लाल झाला होता. मी येस, म्हणून प्रष्नार्थक चेहला केला. ''सर, काही पर्सनल कारणाने मी तुमच्या पार्टीला येऊ शकणार नाही!'' तिचा नकार ऐकताच माझ्या कपाळावरची षिर फूगु लागल्याचे माझ्या लक्षात आले. माझी कानषिले गरज झाली. ''मिस समीक्षा, नकार ऐकण्याची माझ्या कानांना सवय नाही. माहीत आहे. तुम्ही कोणासमोर आणि काय बोलत आहात?'' नकळत अगदी नकळत माझ्या तोंडून शब्द बाणासारखे निघाले. म्हणतात ना गेलेला शब्द आणि सोडलेला बाण परत घेता येत नाही. शप्पथ घेऊन सांगतो त्यावेळी मला क्षणभरही माझ्यावर येणाऱ्या त्सुनामीची कल्पना नव्हती.

पुढच्याच क्षणी समिक्षा विजेसारखी कडाडली. ''हो सर, पूर्ण जाणीव आहे मला मी कोणासमोर बोलतेय. सुप्रसिद्ध उद्योगपती धर्माधिकारी यांचे सुपुत्र नचिकेत धर्माधिकारी कसे म्हणायचे हो तुम्हाला? तुमच्यासारख्या हट्टी, अभिमानी, गर्विष्ठ माणूस कधी दिसला नाही. कोण समजता तुम्ही स्वतःला अं? तुम्ही सोडून बाकी सगळे कीडा–मुंगी. त्यांना स्वतःची मते असू नयेत? त्यांना स्वतःचे प्रष्न असू नयेत? तुम्ही बोलवलंत पार्टीला की सगळयांनी धावत आले पाहिजे तुमच्या मागे. तेही व्यर्थ वेळ घालवण्यासाठी. मिस्टर नचिकेत, आमच्यासारख्या लोकांना अनेक प्रष्नांना, संकटांना रोज तोंड द्यावे लागते. त्यांना अषा मस्तीत राहायला वेळच कुठे असतो? जाऊ दे तुम्हांला हे सगळे कळण्याबाहेरचे आहे. ''बापरे बाप! किती धबाधबा बोलते ही बया. पुढचे सगळे शब्द अग्निबाणासारखे माझ्या मस्तकारवर आदळत होते. बऱ्याच वेळाने भानावर आले तेव्हा झुलणाऱ्या अपमानाने माझे डोके भणभणत होते. काय या पोरीची हिम्मत! समोरील ग्लासमधले थंडगार पाणी घटाघटा प्यायलो, तोंडावर पाण्याचे सपकारे मारले तेव्हा कुठे माझे डोके काम करु लागले.

खुर्चीवरचा कोट उचलून गाडीच्या चाव्या खिषात टाकल्या. केबिनबाहेर आलो बघतो तर काय स्टाफची गडबड उडालेली दिसली. अर्धेअधिक लोक कॉम्प्युटर्स बंद करुन पॅसेज मध्ये घोळका करुन उभे होते. सेक्रेटरीला विचारले म्हणाली, ''सर, तुम्हाला काहीच कसे माहीत नाही? दिवसभराच्या मुसळधार पावसाने शहरात

जागोजागी पाणी साचले आहे. रस्त्यात ट्रॅफिक जॅम आहे. लोकं कुठेकुठे अडकली आहेत. रेडिओवर सर्वांना सांभाळून राहण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. सर, आपल्या ऑफिसमध्ये अनेक लोक लांब राहणारे आहेत. प्रत्येकाला काळजी आहे घरी परतण्याची. मी पण पळते आता.'' असे म्हणून ती घाईने ऑफिसमधली कामे आवरु लागली. मी खांदे उडवले आणि माझ्या खास लिफ्टने तळमजल्यावर पोचलो.

बाहेर पोर्चमध्ये अंधार दाटून आला होता. पावसाने भयंकर रुप धारण केले होते. सोसाटयाचा वारा सुटला होता. पुढे जाऊन बघितले तर मोकळया जागेत कमरेपर्यंत पाणी साचले होते. पाण्याचा खळखळ आवाज एक प्रकारची भयानकता जाणवून देत होता. गेटजवळील दोन झाडे आडवी पडली होती. पावसाने हे रौद्र रुप मला तर नवीनच होते. गॅरेजपर्यंत पोचणे तर अषक्यच होते. रस्त्यावरील काही मोटारींच्या फक्त खिडक्या दिसत होत्या. त्याही पाण्यात बुडत चालल्या होत्या. घरी मम्माला फोन लावला. तिचा काळजीभरला आवाज बरेच काही सांगून गेला. ''नचि, अरे केव्हापासून तुझा फोन ट्राय करते आहे. डॅडींचा फोन लागत नाही. त्यांचा तर काहीच पत्ता नाही. बाहेर पावसाने धुमाकूळ घातला आहे. अषा परिस्थितीत कुठेही बाहेर पडू नकोस. प्लीज. सांभाळून राहा. आपल्या स्टाफची आणि स्वतःची काळजी घे.'' मला एकदम डॅडींची काळजी वाटू लागली. माझ्या बेफिकीर आयुष्यात या क्षणापर्यंत भीती, काळजी कधी जवळपासही फिरकली नव्हती. परंतु आता प्रथमच मला जाणीव झाली ती क्षणभंगुर आयुष्याची. सकाळी घराबाहेर पडलो तर काय काय प्लॅन्स केले होते आणि आज संध्याकाळपासून माझ्या आयुष्यात अनेक धक्के बसत होते. बिच्चारे डॅडी कुठे अडकले असतील?
मी माझ्या केबिनमध्ये येण्यासाठी माघारी वळलो. पॅसेजमध्ये लोक घोळक्या घोळक्याने उभे होते. मी लक्षपूर्वक पाहू लागलो. कोणाची मुलगी कुठेतरी अडकली होती तर कोणाची बायको बेपत्ता झाली. प्रत्येकाची आपल्या घरच्या लोकांषी संपर्क साधण्याची खटपट चालू होती. सगळयांचे चेहरे काळजीने काळवंडले होते. माझ्या काळजात आत कुठेतरी हलले. निसर्गापुढे माणूस किती हतबल ठरतो नाही? हयाक्षणी माझे बंगले, गाडया, पैसा, बॅकबॅलन्स हयापैंकी कषाकषाचा मला उपयोग नव्हता.

''नचिकेत, हया लोकांसाठी तरी काहीतरी कर.'' आतला आवाज बोलला. बाहेर धोधो पडणारा पाऊस वाटेवरचे सगळे वाहून नेतच होता. पण माझा ठासून भरलेला अहंकार, अभिमानही धुऊत नेत होता.'' डॅडी कुठेही असू देत परमेश्वरा त्यांना सुखरुप ठेव.'' मी शेवटी कर्त्याकरवत्या परमेश्वराला साकडे घातले. माझ्या मनातील घालमेल दाबून टाकून मी लोकांना होईल तेवढी मदत करण्याचा निर्णय घेतला.

सेक्रेटरीला सांगून आमच्या कॉन्फरन्सहॉलमध्ये सर्व लोकांच्या राहण्याची सोय केली. सुदैवाने आमच्या प्रत्येक मजल्यावर दोन मोठे हॉल्स, टॉयलेटस, गेस्टरुमस आहेत. डॅडीच्या दूरदृष्टीचे मला फार कौतुक वाटले. सर्वांना प्रथम चहा, कॉफी, खाण्याचे पदार्थ कॅफेटेरियामध्ये उपलब्ध करुन दिले. मी स्वतः वेगवेगळया सेक्षनमध्ये जाऊन लोकांना प्रत्यक्ष भेटून बोलू लागलो. एकेकापुढे अनेक प्रकारच्या समस्या होत्या. त्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करताना, सुखदुःखांषी जवळीक साधताना मला आयुष्यात एक वेगळाच सुखकारक अनुभव येऊ लागला. मम्माचे बोलणे मला आठवू लागले. ‘‘आपण वाटलेले प्रेम आपल्याला दुप्पटीने परत मिळते’’ ती म्हणत असे. त्यांचे दुःख हलके होताना त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारी हलकीषी स्मितरेषा मला एक वेगळीच अनुभूती देऊ लागली.

ऑफिसमध्ये फार थोडे फोन चालू होते. ज्यांच्या घरी संपर्क होऊ शकला, ज्यांच्या घरची खुषाली कळली ते थोडे विसावले होते. अख्या ऑफिसला एक कुटुंबाचे रुप आले होते. या कुटुंबाला जात धर्माची मर्यादा नव्हती, स्त्री–पुरुषांची असमानता नव्हती, तरुण–वृद्धाची तफावत नव्हती. गरीब–श्रीमंतीचे भेद केव्हाच मिटले होते. निसगाने जणू दाखवून दिले होते, ‘‘अरे, हे सगळे भेदभाव तुम्ही निर्माण करता. माझ्यासाठी मालक आणि नोकर सारखेच.’’ मी पुन्हा एकदा बाहेर जाऊन पावसाचा अंदाज घेतला. बाहेर अजूनही खांद्यापर्यंतपाणी होते. आत आमच्या ऑफिसच्या गढीत सर्वजण सुरक्षित होते. मम्माला पुन्हा फोन लावला. पण यावेळी फोन लावण्यात अपयषी ठरलो.

पहाटे पहाटे पर्यंत आम्ही म्हणजे माझा सगळा स्टाफ मला माझ्या स्वतःच्या कुटुंबासारखा वाटू लागला होता. रात्रभर कोणीभुताखेताच्या, गावाकडच्या गोष्टी सांगितल्या. कोणी विनोद सांगितले. कोणी आपल्या लांबलचक आयुष्यात आलेल्या अनेक कडू–गोड आठवणींची उजळणी केली.या सगळयात आमच्या कुकने बहादुरसिंगने भांगडा करुन सर्वावर कडी केली. सुखदुःखाचे सुगंधी क्षण मी प्रथमच अनुभवले. सामान्य, माणसात मिसळल्याने एवढे सुख मिळते? आज मीही अगदी त्यांच्यातलाच एक झालो होतो. मला कुणाला मावषी म्हणावेसे वाटले तर कुणाला ‘काका’ अषी हाक मारावीषी वाटली. सुरुवातीला अंतर ठेवून असणारे लोक अगदी माझ्या जवळ बसून गप्पा मारीत होते.
बाहेर फटफटू लागले तेव्हा पावसाचा भर ओसरला होता. पाणी झपाटयाने उतरु लागले होते. मी पुन्हा एकदा अनाउंसमेंट करायला सांगितले. ज्यांना कोणाला घरी जायचे असेल त्यांच्यासाठी ऑफिसच्या गाडया, माझी गाडी उपलब्ध असल्याचे सांगितले. लोकांना देऊ केलेल्या या छोटयाषा मदतीने सुद्धा ती किती भारावून गेली.

काही वेळानंतर जवळपासच्या कारखान्यातील लोकांनीही आमच्या इमारतीचा आसरा घेतला. मी स्वतः सगळा गार्डनचा सूचना देऊन लोकांना खाद्यपदार्थ वाटण्यास सांगितले. सुदैवाने आमच्या स्टोअररुममध्ये कषाची कमतरता नव्हती. अगदी गरजू लोकांना मी पैसेही वाटले.

या सगळया गडबडीत माझे लक्ष बाहेर लाउंजमध्ये उभ्या असणाऱ्या समिक्षेकडे गेले. ती माझ्याकडे रोखून बघत होती. आता कसला बरं विचार करत होती ही? कदाचित तिलाही घरी परत जाण्यास अनेक अडचणी असतील. काल संध्याकाळी आमच्यामध्ये घडलेल्या प्रसंगानंतर पुलाखालून बरेचपाणी (अक्षरषः पूर) वाहून गेले होते. माझी कुठल्याकुठे विसरुन गेलो होतो. माझे लोक आता आपापल्या घरी सुखरुप कसे पोचतील याच विवंचनेत मी होतो. तेवढयात समिक्षा माझ्याजवळ कधी पोचली मला कळलेच नाही. ''मि. नचिकेत, काल तुम्हाला मी वेडयासारखे काहीबाही बोलले. त्याबद्दल सॉरी.'' मी तिच्याकडे अवाक् होऊन पाहू लागलो. ''कालपासून मी तुमची धावपळ बघते आहे. आम्हा सगळयांना अडचणीच्या वेळी तुम्ही खूप मदत केली. अगदी खूप आधार वाटला तुमचा! आमच्या मदतीला अगदी देवासारखे धावून आलात तुम्ही. एक प्रष्न विचारु तुम्हांला?'' असे बापरे, आता ही काय माझी उलट तपासणी घेते काय? ''आत्तापर्यत, अगदी कालपर्यत आमच्या ऐकीवात, बघण्यात असलेले षिष्ट, अभिमानी नचिकेत आणि कालच्या निसर्गाच्या अक्राळविक्राळ तडाख्यात आम्ही सापडलो असताना आम्हांला अगदी देवासारखे मदत करणारे नचिकेत. यातले खरे कोण?''

पण माझे डोळे बोलून गेले, ''अग, कालपर्यत नचिकेत कुणी वेगळाच होता. आत्ता तुझ्यासमोर असलेला, अंतर्बाह्य बदललेला नचिकेत– हा 'तो मी नव्हेच' तुझ्या सच्चेपणाने आणि निसर्गाने खरमरीतपणे केलेल्या समिक्षेने या नचिकेतला बदलून टाकले, याचे डोळे उघडले. नव्हे डोळयात अगदी झणझणीत अंजन घातले आहे.'' माझ्या स्वच्छ, नितळ, नव्या दृष्टीने बाहेर बघितले तर आकाष निवळले होते. निसर्गाचा धिंगाणा थांबला होता. विनाषाचा पूर ओसरु लागला होता. लोक लगबगीने घर परतायची घाई करु लागले होते. निसर्ग आता लबाड मुलासारखा चुपचाप बसून म्हणत होता–''तो मी नव्हेच.''

# ६ पिझ्झा हट

सकाळी चिमण्यांच्या चिवचिवाटाने माझी झोप उडाली आणि मी चटकन बिछान्यावर उठून बसले. उठताक्षणी पहिली गोष्ट आठवली ती म्हणजे माझ्या लेकीचा वाढदिवस दोन दिवसांवर येऊन ठेपलेला. बापरे, बघता बघता माझी चिमुरडी सोळा वर्षाची होईल. दोनच दिवसांनी. खरंच, काळ कसा भुरभुर उडणाऱ्या शेवरीच्या कापसा सारखा उडून गेला. सोळा वर्षापूर्वी माझ्या छकुलीने माझ्या कुषीतून जन्म घेतला अगदी अलगदपणे फारसा त्रास न देता. त्यावेळी मनाला झालेल्या अनुभूतीची तुलना कषाचीही करता येणार नाही. डॉक्टरांनी हे माझ्या पुढयात ठेवलेल्या मांडीवरच्या त्या पांढऱ्या गुलबट मखमाली  कापडयाासारख्या गाठोडयाला पाहून माझ्या डोळयात टचकन पाणी उभे राहीले.

त्यानंतर अषा कितीतरी सुखद आठवणींनी माझे डोळे ओलवत राहीले. कधी तिच्या गोंडस पावलांनी पहिल्या प्रथम जमिनीवर उभं राहण्याचा प्रयत्न केला तेव्हा तर कधी कधी त्यानंतर दोन चाकी सायकल आधार न घेता चालवली तेव्हा! शाळेत प्रत्येक वर्षी उत्तोमत्तम गुण मिळवून बक्षिसे मिळवली आणि माझ्या पाया पडली तेव्हा. अनेक प्रसंगांची मालिका माझ्या डोळयासमोर हातात हात घालून फेर धरु लागली.

''मम्मा, अगं कोणत्या विचासरात एवढी गढून गेली आहेस?'' प्राजूच्या आवाजाने मी भानावर आले.

''प्राजू, तुझ्याच वाढदिवसाची तयारी कषी करायची ह्या विचारात आहे. घरातल्या चांदीच्या वस्तु धुवून लख्ख करायच्या आहेत. पडले बदलायचे आहेत. तुझ्या खोलीची सजावट बदलायची आहे. नेहमीसारखा तुझ्या आवडीचा श्रीखंड पुरीचा बेत. झालंच तर खीर आणि थोडी पुरणपोळीही करीन म्हणते. तुझ्या कोणत्या मित्र मैत्रिणींना बोलवू या?'' मी माझ्या मनीचा बेत तिला सांगत सुटले.
''पुरे पुरे मम्मा. अगं किती बेत करषील. एवढं सगळं करायची काय गरज आहे. आणि पुरणपोळी, खीर काहीतरीच काय? माझ्या मित्रमैत्रिणी दारातूनच परत जातील. हे सगळं गोडधोड मला पूर्वी आवडत होते.'' होते. या शब्दावर जोर देत ती म्हणाली. अरेच्चा! खरंच की उत्साहाच्या भरात मी तिच्या बदललेल्या आवडीनिवडी विसरुनच गेले की! मम्मा, मी आज कॉलेजमध्ये गेल्यावर ठरवणार आहे सगळं. प्राजूने

सांगितले. पहिली लॉग ड्राइव्ह, मग जेवण, पिक्चर आणि नंतर पिझ्झा हट. ''निलू, कामिनी, भावना पराग सगळे येतील बरोबर. मस्त म्युझिक, डान्स आणि धम्माल म्हणजे हिचा प्लॅन डोक्यात अगोदरच तयार आहे तर.''
ह्या मुलांचे विचार किती जलद आणि स्वच्छ असतात. मी विचार करत राहीले. ह्यांना पाहिजे असलेल्या गोष्टी अगदी तषाच प्रत्यक्षात उतरवतील. मग इतर कुणाचा विचार कषाला करायचा? दोन का तीन वर्षात माझी छकुली किती बदलली. श्रीखंड पुरीची जागा पाणी पुरीने घेतली. घरगुती मऊसूत पुरणपोळीला वातड पिझ्झा ने हुसकावून लावले. दिवसभर घाम गाळून फेटून फेटून बनवलेल्या माझ्या केकला तर आता कोणीविचारेनासे झाले. मॉनजिनीस, हॅगआऊट या ब्रॅडेड केकपुढे माझे घरी बनवलेले केक अगदीच बापुडवाडे पडून राहू लागले. दिवसेंदिवस माझ्या लेकीच्या आवडीनिवडीत फरक पडू लागला. बाहेरील दुकानेही आपली स्वरुपे कात बदलल्यासारखी टाकू लागली. कपडे तर अगदी वरुन आणि खालून दोन्ही कडून आटू लागले. ओढण्या तर अगदी फॅषन सिबॉल बनल्या आहेत. पण तरीही गम्मत म्हणजे ह्या चिमण्या मुली ते कपडे अगदी सहजपणे स्वीकारुन आनंदाने घालून मिरवतात. त्यानं ते खुलूनही दिसतात. काही अपवाद वगळता ह्या मुली किती बिनधास्त, आत्मविष्वासने वावरतात. या बदल्यात परिस्थितीचा आढावा घेताना मला कधी कौतुकही वाटे तर कधी मनाच्या कोंडमाराही होई.

माझ्या बेजार मनाला ही हळूच समजावले काळ बदलतो आहे. बदलत्या काळापुढे मस्तक नमव. शरण जा. तरच ह्या घरात खुषीचे बारे झुळूझुळे वाहतील नाहीतर घरातील फुलबागेचे रखरखीत वाळवंट बनून जाईल. माझ्या कोमजलेल्या मनाला समजावत, चुचकारत, गोंजारत बदलत्या काळाला आणि परिस्थितीला नव्याने सामोरे जाण्याचा निर्णय मी घेतला. माझ्या लेकीला माझ्याकडून विरोधाची नाही तर पाठिंब्याची आवष्यकता होती. म्हणूनच तिच्या वाढदिवसाला तिला खूष ठेवणी ही तर फक्त सुरुवात होती.
मी माझ्या आवाजात गोडवा आणत माझ्या लाडकीला हाक मारली.''प्राजू, मग सांग तरी तुझ्या मनांत आज काय करायचा बेत आहे? अगदी तुझ्या मनासारखं होऊन जाऊ दे. अषी आष्चर्याने नको बघू माझ्याकडे. अगदी मनापासून मी तुझ्या मनीचा बेत विचारात आहे.''
माझ्या या चार शब्दांनीच प्राजूची कळी अषी काय खुलली सांगू? तिच्या उमलत्या चेहऱ्याकडे बघून मलाही खूप बरं वाटलं. माझ्या खांद्यावर हात टाकून अगदी लाडात येऊन ती घडाघडा बोलू लागली आणि तिच्या डोळयातील चमक पाहून माझ्याही डोळयात चमक आली.

शेवटी तिच्या वाढदिवसाचा दिवस उगवला. तिला शुभेच्छा देताना माझा ऊर भरुन गेला. तसं बघता तिला शुभेच्छा देणारे आता आम्ही दोघेच राहीलो नव्हतो. तिच्या स्नेह्यांचा परिध बऱ्यापैंकी रुंदावला होता. रात्री बारापासून तिला शुभेच्छा देणारे फोन खणखणत होते. पहाटेपर्यंत मोबाईल आणि लॅंडलाईनची रिंग वाजत होती. आणि ही खुषाल हसत खिदळत फोनवर गप्पा मारीत होती. नकळत माझा सोळावा वाढदिवस माझ्या डोळयासमोर आला. आमच्या घरात काय तर आजुबाजुच्या दहा बारा घरातही फोन आलेला नव्हता.

वाढदिवस साजरा व्हायचा तो शाळेत किंवा कॉलेजमध्ये चॉकलेटस वाटून. फार तर वीस पंचवीस रुपये खर्च. तोही काहीजणांचा जास्त वाटायचा.
''मम्मा, बघ हा ड्रेस कसा दिसतोय ते.'' प्राजक्ता कॉलेजला निघण्याची तयारी करत होती. तिच्या आवडीचा टॉप आणि जीन्स चढवता चढवता तिची बडबड चालूच होती.
''मम्मी, आमच्या प्रोग्रॅममध्ये थोडासा चेंज आहे. दुपारी आम्ही थोडेसे सीसीडीत खाऊन घेऊ. नंतर एक मस्तपैंकी पिक्चर बघू. त्यानंतर येताना पिझ्झा हट मध्ये थांबू. खूप दिवसात तिकडे गेलो नाही. मस्त धम्माल करु.''

''कर बाई धम्माल कर. तुझे हे दिवसच उमलण्याचे आहेत. फुलपाखरासारखी बागड. स्वच्छंदीपणे फिरुन घे. हे दिवस एकदा सरले की पुन्हा येणार नाहीत. निसटून जातील हातातून एखाद्या बर्फाच्या खडयासारखे. मग वाट बघून कितीदाही बोलावले तरी हे दिवस येणार नाहीत तुझ्या हातात. फक्त एवढंच ध्यानात ठेव, फुलपाखरासारखे स्वच्छंदी उडताना फुलपाखरासारखे निरागस आयुष्य जग. कुणाला दुखवू नको. माणुसकीची साथ सोडू नको. आपल्या माणसांचा आदर करायला षिक.'' मी कळकळीने तिला काय काय सांगत सुटले.

''मम्मा, बस आतात्र अग मी घाईत आहे. मला मध्येच थांबवत ती म्हणाली. आपण नंतर सावकाष बोलू.'' असं म्हणत तिने मला चक्क कवटाळले आणि माझा गालगुच्चा घेतला. भराभरा पायात सॅंडल्स घालून ती पळालीही कॉलेजला. मी कितीतरी वेळ ती गेलेल्या रस्त्याकडे बघत बसले. काय म्हणावं या पोरीला? कधी वैषाख वणव्यासारखी आग पाखडते. तर कधी श्रावणातल्या सरींसारखी गारवा बरसून जाते. ह्या पोरीला जितकं समजावून घेण्याचा प्रयत्न करते तितकी मी कोळयाच्या जाळयात अडकल्यासारखी गुंतत जाते.
एक निःस्वास टाकून मी कामाला लागले. कितीही नाही म्हटलं तरी माझा उत्साह पुन्हा उतू आलेल्या दुधासारखा ओसंडून वाहू लागला. बैठकीच्या खोलीकडे मोर्चा वळवून पाहिले जुने पडदे बदलून परवाच नवीन आणलेले गुलबट केषरी रंगाचे पडदे

लावले. बागेतील ताजी फुलं खुडून फुलदाणीत रचली. फर्निचरवरुन प्रेमळपणे हात फिरवून नव्या कुषन्स काढून नीट लावून ठेवल्या. नजरेला सगळं काही व्यवस्थित वाटल्यावर प्राजक्ताला आवडणाऱ्या एअर फ्रेषनरचा फवार घरभर उडवला. प्राजक्तासाठी आणलेले कानातले सुंदर लोंबत झुंवर मखमाली पेटीसकट तिला सहज दिसतील असे तिच्या आरषाच्या कपाटावर ठेवले. प्राजू कितीही नको म्हणाली तरी घरात काहीतरी गोडधोड करावे म्हणून मी किचनकडे वळले. पटपट हात चालवीत रवा भाजला. थोडयाच वेळात सुंदर खमंग वास सुटून मस्त केषर, चारोळी बेदाणे घातलेला षिरा तयार झाला. आता थोडया पुऱ्या कराव्यात का या विचाराने कणीक भिजवली तेवढयात दारावरची घंटा वाजली.

एवढयात कोण आले असणार असा विचार करत मी गॅस बंद केला आणि नॅपकिनला हात पुसत दार उघडले. दरवाज्यात उभ्या असणाऱ्या प्राजु आणि कंपनीला बघून माझा आ वासला गेला. एका हाताने मला बाजुला करीत सगळी मंडळी धडधड आत षिरली. आतमध्ये षिरल्यावर जिकडे जागा मिळेल तिथे पसरली. बघता बघता घर पक्ष्यांनी भरलेल्या आभाळासारखे व्यापून गेले. ''अगं, हा काय प्रकार आहे? तुम्ही पिक्चर बघुन पिझा हटमध्ये जाणार होतात ना? मग हे असं अचानक काय झालं? सगळं ठीक आहे ना?'' ''हो, ऑटी, सगळं काही ठीक आहे.'' पूजा म्हणाली. त्याचं काय झालं, फ्रिजमधून पाण्याची बाटली काढून तोंडाला लावीत पराग म्हणाला ठरल्याप्रमाणे कॉलेज सुटल्यावर थोडफार खाऊन आम्ही मल्टीप्लेक्सला गेलो. खूप धम्माल केली. आईस्क्रिम खाल्लं, पॉपकॉर्न खाल्ला. (ही लोक खाण्याषिवाय काय करतात माझ्या मनात विचार आला) कॉमेटस पास केल्या.

'मी एकदा षिट्टीही मारली.'' म्हणाला मला त्यांच्या निरागसपणावर हसू आलं. हसू दाबत मी विचारलं, ''पुढे काय झालं?'' माझी उत्सुकता ताणली गेली. ''अगं ऐक ना. पुढे काय झालं ते?'' प्राजू म्हणाली, ''आम्ही तसेच हसंत खिदळत रमत गमत पिझ्झाहटकडे निघालो. वाटेत एकमेकांची खिल्ली उडवत, टपल्या मारत एकदाचे पिझ्झाहट मध्ये पोचलो. आमच्या आवडत्या जागा पकडून बसलो. खायला काय मागायचे याचा विचार करु लागलो. तेवढयात आमच्या कानावर संदीपचा आवाज पडला.''

''आता हा संदीप कोण?'' मी त्रासून विचारले अगं, संदीप म्हणजे तिथे सर्विस देणारा मुलगा. आम्ही सगळे चांगले ओळखतो त्याला. कॉलेजमध्ये षिकून नोकरी करतो तिथे. गरीब आहे ग बिचारा. स्वभावाने पण खूप चांगला आहे. तर त्याचा रडवेला आवाज कानावर पडला आणि आम्ही सगळे बोलायचे थांबलो. मॅनेजर त्याला रागाने

झापत होता त्यांच्या बोलण्यावरुन एवढंच कळलं की संदीपने दोनदा चुकीची ऑर्डर घेऊन बिलही चूकीचे वसूल केले होते. त्या गडबडीत मॅनेजरला चांगला सातषे आठषेचा फटका बसला होता. चूक संदीपचीच होती. आम्ही मध्ये पडलो संदीपला विचारले अरे असा कसा तू वेंधळा? इतक्या दिवसाच्या अनुभवानंतरही तू अषी चूक करावी. कर आता आपल्या चुकीची भरपाई. आधीच कावराबावरा झालेला संदीप आमच्याकडे बघून चक्क रडायलाच लागला. त्याला असं ओक्साबोक्सी रडताना बघूनल मी तर गोंधळूनच गेले. एकदम कसंतरीच वाटलं गं. अगं, इथे आम्ही एवढे हसत मजेत खिदळत होतो आणि हा मुलगा अगदी जेमतेम दोन वर्षानी लहान असेल किंवा नसेलही, इतका अगतिक झालेला.

मी नकळत पुढे झाले. त्याच्या खांद्यावर हात ठेवत त्याना म्हणाले, ‘‘संदीप शांत हो. पाणी पी. ही सगळी काय भानगड आहे सांग पाहू शांतपणे.’’ संदीप बोलू लागला, ‘‘ताई कुठून आणू मी एवढे पैसे. घरची परिस्थिती खूप खराब आहे. त्यातून आई खुप आजारी आहे. तिला कमालीची पोटदुखी आहे. डॉक्टरांनी ताबडतोब ऑपरेषन करायला सांगितले आहे. त्याच विवंचनेत होतो सकाळपासून म्हणून कषातच लक्ष लागत नव्हते. तेव्हाच ही चूक झाली बघा. घरात वडीलांचं छत्र नाही म्हणून तर आईला मदत करतो थोडीफार माझ्या नोकरीतून. ताई, आमच्या एक ना दोन अनेक चिंता आता काय काय सांगू तुम्हांला.’’ संदीप केविलवाणं होऊन म्हणाला. ‘‘मम्मा, मी अवाक होऊन हे सगळं ऐकत बसले. एवढा छोटा मुलगा एखाद्या पहाडासारखा किती अडचणींषी टक्कर देत होता. मला न एकदम वेगळयाच जगाषी ओळख करुन दिली त्याने. त्या जगात मिनिटा मिनिटाला नवी अडचणी, पैषाच्या, असुरक्षिततेच्या आणि कसल्या कसल्या. ही माणसं फक्त प्रेमावर जगतात का असा प्रष्न पडला मला. ते तरी करायला आणि दाखवायला त्यांना कुठे उसंत असते आणि नषीब तरी त्यांना कधी ती संधी कोठून देते गं? भयंकर आहे हे सगळं.’’ैपउ. चसल ींवततपइसम! ती विलक्षण गंभीर होऊन बोलत होती. मी तिच्याकडे विस्मयाने बघत राहीले. या क्षणी माझी प्राजू मला विलक्षण वेगळी वाटली. एका प्रसंगाने तिला केवढी मोठी केली होती. तिच्यातील संवेदनषीलता जागृत केली होती. मनात म्हटलं. ‘‘प्राजू आता नुकतीच तुझी वास्तवाषी ओळख होत आहे. अजून तुला खुप जग बघायचं आहे.’’ मी तिला खांद्यावर थोपटलं ‘‘हं, मग पुढे काय?’’ मी तिला आठवण करुन दिली.

प्राजक्ताची मैत्रीण आर्या पुढे सांगू लागली. ‘‘मग ऑटी त्याची परिस्थिती बघून आम्हांला सगळयांना खरंच खुप वाईट वाटलं. पार्टीचा मूडच गेला. त्याची बिचाऱ्याची खुप दया आली. वाटलं हयाच्यासाठी काहीतरी करावं. आम्ही एकमेकांना खूण केली ती सहमत असल्याची होती. आम्ही संदीपला मदत करायची ठरवलं. आमच्या जवळ असतील नसतील ते सगळे पैसे आम्ही गोळा केले. प्राजक्ताकडे सगळयात जास्त

पैसे होते. सकाळी रक्कम चार हजारापर्यंत गेली. तिच्यातून आम्ही पहिले मॅनेजरचे पैसे परत केले. उरलेल्या पैषातून संदीपच्या आईची औषधे आणली. बाकी रक्कम संदीपकडेच ठेवली. त्याच्या आईला उद्या ॲडमिट करायचे ठरवले आहे. पण त्यासाठी ज्यादा रक्कम लागणार आहे. ती कषी जमा करायची आहे हेच आम्ही आता ठरवणार आहोत, प्रत्येकाच्या पॉकेटमनीतून जमा असलेल्या रक्कमेतून मला वाटतं होतील तेवढे पैसे. पण हॉस्पीटलचा खर्च, पुढे लागणारी औषधे काय आणि कसं करावं समजत नाही. ऑंटी. बिचारा संदीप तर आईला औषधं मिळाली हयाच आनंदाने अक्षरषः नाचू लागला.

''मॉम, आमची पार्टी मध्येच अचानक आम्हांला नवीनच काही षिकवून गेली. सॉरी, तुला न सांगता मी सगळे पैसे संदीपला देऊन टाकले. पण, काय करु हे सगळं तुला कळवायला मला वेळच मिळाला नाही. आम्ही चुकीचं तर वागलो नाही ना?''

माझ्याकडे आषेने बघणाऱ्या प्राजुला मी जवळ घेतले. तिच्या पाटील हात फिरवून म्हणाले, ''मुळीच नाही. तुम्ही सगळयांनी अगदी योग्य तेच केलेत. आज तुम्ही आम्हालाच दाखवून दिलेत की तरुण पिढीतरी संवेदनषीलत, सहृदयता, माणुसकी अजूनही ठासून वेळ लागतो पण तोही दोष आमच्या पिढीचाच धरला पाहिजे. आम्हीच तुम्हाला ती दाखवायला वाव दिला पाहिजे. तसे संस्कार केले पाहिजेत आज तुम्ही दाखवलेल्या मनाचा मोठेपणाने मलाच ठेंगणे वाटते आहे.'' बोलता बोलता माझ्या डोळयाच्याकडा ओलावल्या. प्राजू आणि सगळी कंपनी माझ्याकडे भारावून बघत राहीलेले मला कळत होते. त्यांच्यातल्या हुरुप मला जाणवत होता. वातावरणात आणखी उत्साह भरण्यासाठी मी सर्वाकडे बघत बोलले.
''चल आता. पैषाची काळजी सोडा. ते मी आणि प्राजूचे बाबा बघून घेऊ. आता तुम्ही एकच काळजी करा आणि ती म्हणजे खाण्याची. चांगलं एवढं मोठं सत्कार्य करुन आलात तर खूप भूक लागली असेल ना?
''ऑंटी, तुमच्या हातचं बनवलेलं आम्हाला काहीही चालेल. खरंच खूप भूक लागली आहे. पोटातल्या कावळयांच्या पिल्लांनाही पिल्लं झाली.'' सगळी मुलं एकसूरात ओरडली.

मी डोळयातलं पाणी पुसत माझ्या लेकीचा वाढदिवस आज खऱ्या अर्थाने साजरा झाल्याच समाधानात किचनकडे वळले.

❤❤❤

## ७ माय

**पिव**ळया एसटीचे दार तानीच्या मागे खाडकन आपटले आणि तानीने हुष केले आपल्या डोक्यावरचे गठुडे खाली ठेवून ती एस.टी. च्या पायरीवरच बसती झाली. काखोटीला मारलेले लेकरु मगापासून गप्पगार होते. ते आता वळवळ करु लागले. त्याला पदाराखाली घेऊन तिने कपाळावरचे घामाचे थेंब पुसले. अंबाडयाच्या सुटलेल्या बटा नीट करुन घट्ट अंबाडा बांधला. आता जरा निवांतपणा मिळाल्यावर **घशाला** पडलेली कोरड तिला जाणवली. त्याबरोबर गठुडयातील घट्ट डब्याचे झाकण उघडून पाणी पिण्यासाठी अख्खा डबाच तिने तोंडाला लावला. कमरेची चेंची सोडून बाईचं तंबाखूची गोळी तोंडात टाकली तेव्हा कुठे तिला बरे वाटले. गळा आणि मन ओलं झाल्यावर तानीची नजर इकडेतिकडे भिरभिरली.

अख्खी एसटी आतनं माणसांनी गच्च भरली होती. कोणी तानीच्या गाववालेच होते तर कोणी गावचे दुकानदार, बडे आसामी दिसले. सगळेच तालुक्याला निघाले होते जणू. कोणी दाटीवाटीने उभे होते, तर कोणी एकमेकांना चिकटून धक्के देत बाकडयावर गुळासारखे चिकटले होते. त्या गर्दीतही तंबाखूची फक्की मारताना दिसत होते. कोणी बापे डोईवरच्या टोप्या काढून त्यानेच वारा घेत होते. काही कुंभकर्णानी लागलीच डुलक्याही काढायला सुरुवात केली होती. तानीला खुदकन हसू फुटले. ‘अक्षी माझ्या महादयावाणी आहेत ही गडीमाणसं! जरा जागा मिळाली की लागली घोरायला. तसा कामालाही वाघ. पण औंदा गडयाने लईच घोर लावला जीवाला. तापाने निमित्त झाले आणि महिनाभर खाट पकडली गडयाने. गबरु पैलवानासारखा दिसणारा माझा महादू पार ऊसाच्या चिपाडयासारखा झाला महिन्यात! लई औषध पानी झाली तवा कुठे ताप हटला. पण मदल्या काळात शेतीची पार वाट लागली. म्या कंबर कसली म्हणून निभावले कसंतरी. आई रेणूकाने तारले म्हणून माझा सोन्यासारखा संसार तरला’ तानीने नव्याने रेणुकादेवीला साकडे घातले. मनातल्या मनात शंभरदा आभार मानले देवीचे.
‘अहो बाई, कुठे जायचे तुम्हाला? लवकर सांगू बघू. तिकीट फाडतो तुमचे. कडंक्टर तिच्यापुढे हातातील चिमटा नाचवत गठुडयात हात घालून तिने पिवळया नोटा काढल्या. तालुक्याला रांजणगांवला जायचे बघा.’ आणि हा पोरगा– किती वर्षाचा बाई?’ ‘या पेरणीला तीन वर्षाचा होईल बघा.’ तानीने आकडेमोड केली. कडंक्टर हसला. ‘बरं राहू दे. घ्या तुमचे तिकीट.’ तानीने तिकीट नीट जपून पोलक्यात ठेवले.

उरलेल्या जीर्ण नोटांचा हिषोब केला. धन्याने रांजणगांवला जाऊन बियाणे आणायला सांगितले होते. ऐनवेळी तो आजारी पडला सासरा– दादू म्हातारा. लई वाकलेला. हाताषी मदतीला असलेला गणपा नेमका सासुरवाडीला जाऊन बसलेला. तानीने धीर केला. पेरणी वेळेवर झाली पाहिजे. नंतर पावसाचा काय नेम सांगावा. पाऊस आणि नषिब यांचा काय भरवसा? कधी पाठ फिरवेल कुणी सांगावे. तालुक्याला जाऊन चांगले बियाणे आले पाहिजे. पुढची सारी मिळकत शेती, भाजीपाला यावर अवलंबून संसाराला– पोटाला चार दाणे तर मिळाले पाहिजेत. लेकराला नीट मोठं करायचं तानीचं स्वप्न होते. तिने महादूकडे नीट चौकषी केली.

तालुक्याला जाण्यासाठी पहाटे उठून समदी तयारी केली. चार भाकऱ्या थापल्या. बरोबर कोरडयास करुन घेतले. म्हाताऱ्याची नीट सोय केली. महादूची दवादारु तयार केली. सगळी व्यवस्था लावून निघाली तर लेकराने सूर टीपेला लावला. पोराच्या डोळयातल्या पाण्याने तानी विरघळली. त्याला धडके कपडे चढवून काखोटीला मारले. 'चल बरं लेकरा, यायचं तर ये. पण डोक्याला ताप दयायचा नाही बरं का!'' लेकराने खुषीच्या भरात नाक फुरफरवले. खुषीत येऊन ते तानीला बिलगले. मग डोईवरचा पदर नीट करीत गठुडे आणि पोरगं सांभाळत तानीने बसस्टॅंडचा रस्ता सुधरला.
'अहो बाई, इथे रस्त्यात पायरीवर कुठे बसल्यात? जरा पुढे जाऊन बसा की. काय बाई माणसं ही काही म्हणजे काही मॅनर्स नाहीत बाई'' एक गोल पातळवाली बाई फणकारली. तानीने निमूटपणे आपले गठुडे उचलले. पोराला छातीषी कवटाळले आणि गर्दीतून ती पुढे सरकली. एका भल्या माणसाने थोडे सरकून तिला जागा करुन दिली. 'फार उपकार झाले भाऊ' तानी उद्‌गारली. एव्हाना तानीचे पोरगंही ताजेतवाने होऊन टकामका बघू लागले होते. एसटीचा प्रवास त्याच्यासाठी नवीन होता. आजुबाजुची माणसे, गर्दी तो आपुल्या चिमुकल्या डोळयाने न्याहाळत होता. त्या नव्या नवलाईत त्याला तहानभुकेची पर्वा नव्हती. तानी जवळ असण्याचाच त्याला खुप खुप आनंद झाला होता. त्याच आधारावर तो नवीन जगाला सामोर जात होता. 'माय, माय खिडकी' आपुले चिमुकले बोट तो बाहेर दाखवून म्हणाला 'माय, झाडं' तानीही लेकराकडे कौतुकाने बघत म्हणाली, 'व्हयं रे, माझ्या लेकरा 'बघून घे सगळं. '

'माय, भाऊ' तानीने समोर बघितले. सुंदर गुटगुटीत गोरापान मुलगा आपल्या आईवडिलांना बिलगून बसला होता. 'मोट्ठी माणसं दिसतात' तानी मनातल्या मनात पुटपुटली. मुलाची आई बाहुलीसारखी दिसत होता. मधून मधून मुलाला काहीबाही भरवत होती. तानी नकळत त्यांना निरखून पाहू लागली. कधी फळं तर कधी बिस्कूट. कधी प्लॉस्टीकच्या खोक्यातून काहीतरी पित होती. पण मुलाला तर काहीच

©माझ्यामना ई प्रकाशन

नको होते. मग ही बाहुलीसारखी बया कषाला दमदाटी करुन त्याला भरवत होती? तानीने आपल्या पोराच्या सुकलेल्या तोंडाकडे बघितले. त्याच्या तोंडावरुन हात फिरवून त्याला जवळ घेतले. पुन्हा एकदा तिचे वेडे मनं त्या माणसाला न्याहाळू लागले कसे सुंदर कपडे घातले होते त्याने. बूटही घातले होते. तिघेही एकमेकांना बघून खुदूखुदु हसत होते. बाहुली आपले लांडे केस झटका देऊन पुन्हा पुन्हा मागे करीत होती. तानी मोठया नवलाने त्या तिघांना निरखत होती. एवढा तरास होतोय केसांचा तर लांडे ठेवायचेच कषाला? तानीला सगळे खुळयावाणी वाटत होते. एवढे लाडे लाडे बोलणे तिला धन्याचे आणि स्वतःचे बोलणे आठवले. आपुन तर असे कधीच वागत नाही धन्याषी. या शहरी लोकांचे सगळं अक्रितच. भूक नसताना खायचं. खात असताना टाकायचं. तानीला गावचा दुष्काळ आठवला. पोराचे कधीकधी खाण्या पायी होणारे हाल आठवले. तिने पोराला आणखी कवटाळले.

बघता बघता समोरच्या पोराने कसला तरी हट्ट धरला. लागलीच त्याच्या बापाने वरच्या पिषवीतून वस्तू काढून दिली. ओहो! किती सुंदर वस्तु होती ती. लाल लाल चमकदार खेळण्यांतील गाडी. अंग बया, किती महागडी गाडी ती. तानी डोळे विस्फारुन बघू लागली. 'एवढया गाडीच्या किंमतीत किती बरं बियाणे येईल.' तानी विचारात पडली.

'माय, गाडी गाडी' लेकराच्या आवाजाने तानी भानावर आली. तानीच्या तान्हुल्याच्या दृष्टीस ती सुंदर, लाल चकमदार गाडी पडली अन् सगळाच घोळ झाला. आत्तापर्यंत शहाणे असलेले लेकरु वासरावाणी हातपाय झाडू लागले. किंचाळू लागले. तानीने त्याला चुचकारले, आंजारले– गोंजारले. लिमलेटची गोळी दिली. पण छया पोरं काही शांत होईना. समोर दिसणाऱ्या चकचकीत मोटारीने तानीच्या लेकराला पार खुळे केले. तानी अगतिक झालेल्या तानीची बोटे कडाकडा लेकराच्या गालावर उमटली. 'मेल्या कषाला कडमडलास इथे मला तरास दयायला.' लेकरु अवाक् झाले. गपगार झाले. बावरुन तानीकडे टकामका बघू लागले. कधीही न मारणारी माय आज अषी का वागते? त्याना काय उमजेना. गोंधळले बिचारे. मुसमुसत शांत झाले. तेवढयात त्याच्या चिमुकल्या डोक्यात काहीतरी चमकले. त्याच्या डोळयासमोर त्याची एकुलती एक खेळणं, असलेली रंगीबेरंगी भिंगरी आली. येताना मायच्या नकळत त्याने ती गठुडयात टाकली होती. त्याला एकदम उत्साह वाटला. गठुडयात हात घालून त्याने भिंगरी काढली. चिमुकल्या मुठीत त्याने भिंगरी धरुन ते जग जिंकल्याच्या आनंदात तानीकडे बघू लागले. तानी अजूनही रागातच होती. 'मेल्या, ऐकत नाहीस, आता ती दळभद्री भिंगरी गावली हो तुला.'तानीने परत एकदा त्याला धपाटा घातला. पोरगं तार स्वरात किंचाळलं. पण हयावेळेस समोरचं पोरगं पण किंचाळलं. लाल लाल

मोटर त्याने टाकून दिली. समोरचं पोरगं पण किंचाळलं. 'आई, आई भिंगरी, भिंगरी पाहून ते येडं झालं हातातली लाल लाल मोटर त्याने टाकून दिली. समोरचा पॅंटवाला आणि गोल साडीवाली बाहुली मेटाकुटीला आली त्याला समजावताना पण पोरगं भिंगरीसाठी हटून बसंल. हातापाय आपटू लागलं.

तानी चकीत होऊन पाहू लागली. तिच्या काळयाभोर डोळयात आष्चर्य दाटलं. पॅंटवाल्याच्या पोराला माझ्या दहा पैषाच्या भिंगरीने येडं केलं? तानीचा राग कुठल्या कुठे पळाला. एवढा वेळ तानीला वाकुल्या दाखवून खिजवणारं तानीचे दारिद्रय आता अभिमानाने मिरवू लागलं. 'वारं माझ्या सोन्या!' तानीने आपल्या पोराभोवती कडाकडा बोटं मोडून त्याना छातीषी धरलं. त्याच्या सुकलेल्या अश्रूंना तिने हळूवार पुसून काढलं. लेकरुही आईला घट्ट बिलगलं. आणि गोड हसलं. तानीतल्या मायला अगदी कृतार्थ वाटलं तिले लेकराकडे एकदा दृष्टी टाकली. त्याच्या मुठीत घट्ट धरलेली भिंगरी वाऱ्यावर मस्त डुलत होती आणि तानीकडे बघून जणू खुदकन हसत होती.

❤❤❤